गुरूपरंपरा अशा विविधप्रकारे ज्ञानदेवांचा गुरूभाव ज्ञानदेवीच्या ओव्याओव्यातून प्रकट होतो. जणू गुरूभक्तीचे एक विलोभनीय इंद्रधनुष्यच !

**आत्मरूप गणेशु केलिया स्मरण ।**
**सकळ विद्यांचे अधिकरण ।**
**तेचि वंदू श्रीचरण । श्रीगुरूचे ॥**

**जयाचेनि आठवे । शब्दसृष्टी आंगवे ।**
**सारस्वत आघवे । जिव्हेसि ये ॥**

**म्हणोनि साधका तू माऊली ।**
**पिके सारस्वत तुझिया पाऊली ॥**

या ओव्यांमधून ओसंडून वाहणारा गुरूभाव ज्ञानदेवांच्या अनन्यसाधारण गुरूभक्तीचे दर्शन आहे. याप्रकारे गुरूचे स्मरण सकळ विद्यांचे अधिकरण आहे. अवघे सारस्वत गुरूचरणीच निर्माण होते. ज्ञानदेवांची ही गुरूनिष्ठा, गुरूसामर्थ्याविषयींचा आत्मविश्वास हाच पुढे वारकरी संप्रदायाच्या पायाभूत तत्वांमध्ये एक आदर्शतत्व म्हणून समाविष्ट झाला. ज्ञानदेवांनी दाखविलेल्या या गुरूभक्तीच्या मार्गानेच आजवरच्या वारकरी संप्रदायातील गुरूपरंपरेची वाटचाल झालेली आहे. नाते-गोते, जाती-कुळ, वय न पाहता केवळ अंतरंगाचे अधिकारीपण पाहून वारकरी संप्रदायात जी गुरूपरंपरा चालत आल्याचे दिसते, त्या परंपरेच्या मुळाशी ज्ञानदेवांचाच गुरूभाव आहे. **जाणतेनि गुरू भजिजे । तेणे कृतकार्या होईजे । मूळसिंचने सहजे । शाखापल्लव संतोषती ॥** या ज्ञानदेवांच्या उपदेशानुसारच वारकरी संप्रदायात विठ्ठलभक्तीबरोबरच गुरूभक्तीला अग्रक्रमाचे स्थान दिले गेलेले आहे.

ज्ञानदेव प्रमाणेच ज्ञानदेवांच्या इतर ग्रंथरचनांमध्येही त्यांचा गुरूभाव ठायीठायी ओसंडलेला आहे. अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, हरिपाठ आणि स्फुट अभंगांमध्येही त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचे सारे श्रेय गुरू निवृत्तिनाथांनाच दिलेले आहे.

**अविद्येचे काळवखे ।**
**की स्वबोधसुदिने फाके ।**
**सिवतले प्रसादार्के ।**
**जयाचेनि ॥**

**जयाचेनि कृपासलिले ।**
**जीवू हा ठाववरी पाखाळे ।**
**जे शिवपणही वोविळे ।**
**अंगी न लवी ॥**

अशाप्रकारे अमृतानुभवामध्ये ज्ञानदेवांनी गुरूप्रसाद, गुरूकृपा यांचे मोठेपण गायिलेले आहे. अमृतानुभवाच्या १० प्रकरणांमध्ये 'श्रीगुरूस्तवन' नावाचे एक स्वतंत्र प्रकरणच ज्ञानदेवांनी लिहिलेले आहे. ज्ञानदेवांच्या गुरूभावाचे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्यांना शिष्याचे वेगळे स्वतंत्र अस्तित्वच मान्य नाही. गुरूच शिष्यरूपाने प्रकट होतो अशी त्यांची धारणा आहे. **एकपण नव्हे सुसास । म्हणोन गुरू-शिष्यांचे करोनि मिस । पाहणेचि आपली वास । पाहतसे ॥** (२:१३) **म्हणोनि शिष्यु आणि गुरूनाथु । या दोन्ही शब्दांचा अर्थु । श्रीगुरूचि परी होतु । दोहो ठायी ॥** (२:६१) **का सुवर्ण आणि लेणे । वसते एके सुवर्णं । वसते चंद्र चांदणे चंद्रीची जेवी ॥** (२:६२)

चांगदेवाच्या कोण्यापत्राला ज्ञानदेवांनी उत्तरादाखल लिहिलेल्या ६५ ओव्यांचे पत्र म्हणजे 'चांगदेव पासष्टी'. तसे पाहिले तर हा ज्ञानदेवांचा 'सखासंवाद' आहे. ज्ञानदेव चांगदेवाला मित्र म्हणत नाहीत 'सखा' म्हणतात. हे लक्षात घेण्यासारखे आहे. मित्र शब्दापेक्षाही त्यांना सखा शब्दातून एक वेगळीच जवळीक दर्शवायची आहे, असे दिसते.

सखया तुझेनि उद्देशे । भेटावया जीव उल्हासे । चांगदेव पासष्टीतील वरील ओवीत ज्ञानदेवांनी चांगदेवाचा सखया असा स्पष्ट उल्लेख केला आहे व मी तुला भेटण्यास उल्हासित आहे असे म्हटले आहे. या सख्यासंवादातही ज्ञानदेव गुरूचे विस्मरण होऊ देत नाहीत. हे पत्रलेखन म्हणजे गुरू निवृत्तिनाथांच्या कृपेने लाभलेले स्वानुभवाचे रसाळ खाद्य आहे असे ते म्हणतात. चांगदेवा तुझेनि व्याजे । माऊलिया श्रीनिवृत्तीराजे । स्वानुभव रसाळ खाजें । दिधले लोभे ॥६१॥

ज्ञानदेवांच्या 'हरिपाठ' रचनेस वारकरी संप्रदायात नित्य पठणाचे महत्व आहे. काहीजण त्यास वारकरी संप्रदायाची **'त्रिकाळ संध्या'** म्हणतात. या २७ अभंगांच्या रचनेतही ज्ञानदेवांनी गुरूगौरव केला आहे. ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधले संपूर्ण माझ्या हाती ॥ (१२:४) ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधले । निवृत्तीने दिले माझ्या हाती ॥ (१७:४) ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तीदेवी ज्ञान । समाधी संजीवन हरिपाठ ॥ (२७:६) या हरिपाठातील रचना ज्ञानदेवांचा गुरूभाव प्रकट करतात. ज्ञानदेवांच्या नावावर सुमारे ९५० अभंग रचना आहे. या अभंगांमध्येही **गुरू हा संतकुळीचा राजा ।** असे गुरूमाहात्म्यपर अनेक अभंग ज्ञानदेवांनी रचलेले आहेत. हे अभंग म्हणजे ज्ञानदेवांचे गुरोपनिषदच आहेत.

## नवविश्वाभक्तीचे उत्कट दर्शन

ज्ञानदेवीच्या विविध अध्यायांतून प्रकट होणारी ज्ञानदेवांची गुरूभक्ती ही तर नवविश्वाभक्तीचे मूर्तिमंत दर्शन आहे. माझ्या हृदयात सद्गुरूचा निरंतर वास आहे. त्यामुळेच मी हा संसारसागर तरून गेलो आहे. त्यांच्या ठशामुळेच मला विवेकाचा विशेष आदर वाटतो. चिंतामणी हाती आल्यावर जशी सर्व मनोरथे पूर्ण होतात तसा मी निवृत्तिनाथांच्या कृपेने पूर्णकाम झालेलो आहे असे पहिल्याच अध्यायातील मंगलाचरणात ज्ञानदेव म्हणतात.

१० व्या अध्यायात गुरू नमन करताना **ओम् नमो विशदबोधविदग्धा । विद्यारविंदप्रबोधा । परापरमप्रमदा । विलासिया ॥** अशा विशेषणांचा ते वर्षाव करतात. ब्रह्मज्ञानाचा बोध करून देण्यास हे गुरूराया तूच समर्थ आहे. विद्यारूपी कमलाचा तूच विकास आहेस. परा प्रकृतीशी विलास करणारा तूच आहेस. तुला वंदन असो. तू संसाररूपी अंधाराला नष्ट करणारा सूर्य आहेस. सूर्यावस्था-आत्मसमाधीचे लालनपालन तूच करतोस. तुला नमन असो. तू शुभकल्याणरूपी रत्नांचा संग्रह आहेस, तू सज्जनरूपी वनाला सुगंधित करणारा चंदन आहेस. तू आत्मसाक्षात्काराचा सर्वाधिकारी आहे. वेदातील ज्ञानरसाचा तू सागर आहेस. एवढी विशेषणे वापरूनही अखेरीस ज्ञानदेव म्हणतात -

**तैसे श्रीगुरूचे महिमान।**
**आकळिते के असे साधन।**
**हे जाणोनि मिया नमन।**
**निवांत केले** ॥ (ज्ञा. १०:१३)

ज्ञानदेवीच्या १२ व्या अध्यायात ज्ञानदेव गुरूकृपादृष्टीचे माहात्म्य वर्णन करतात. **अहो सद्‌गुरूचिये कृपादृष्टी। तुझे कारूण्य जयाते अधिष्ठी। तो सकळ विद्यांचिये सृष्टी। धात्रा होय** ॥ गुरूकृपादृष्टी लाभली तर तो सकळ विद्यांच्या सृष्टीचा धात्रा म्हणजे ब्रह्मदेव होतो. गुरूकृपादृष्टी लाभली तर तो सकळ विद्यांच्या सृष्टीचा धात्रा म्हणजे ब्रह्मदेव होतो. गुरूकृपादृष्टी शुद्ध, उदार आणि अखंड आनंदाचा वर्षाव करणारी आहे. विषयरूपी सर्पांचा दंश गुरूकृपादृष्टीने निर्विष होतो. या कृपादृष्टीमुळे सेवकाची ब्रह्मानंदाची हौस पूर्ण होते. आत्मसाक्षात्काराचे लाड पुरविले जातात. मूलाधारचक्राच्या मांडीवर शिष्याचे गुरूमाऊली कोडकौतुकाने संगोपन करते. हृदयरूपी आकाशाच्या पाळण्यात शिष्यांना निजवून आत्मज्ञानाचे झोके देते. आपला जीवभाव ओवाळून टाकते. मन व प्राणाची खेळणी देते. गुरूकृपेच्या पाऊली अर्थात त्या कृपाप्रसादानेच सारस्वत पिकते असे ज्ञानदेव वर्णन करतात.

अध्ययन-अध्यापन यापेक्षाही हॉटेलातील चहाचे कप-मद्याचे ग्लास आणि सिगारेटचा धूर यातूनच जवळिक साधणारे आजचे गुरूशिष्य संबंध पाहणारांना ज्ञानदेवांचा गुरू-शिष्य संबंध आकलन होण्यापलिकडचा आहे. **ज्ञानदेव म्हणे गुरूचा मी दास। नेणे साधनास आन काही।** ज्ञानदेवांच्या मते गुरूसेवा म्हणजे सर्व भाग्यांची जननी आहे. नदी जशी समुद्रमय होते, पत्नी जशी पति-समर्पित असते तसेच शिष्याने गुरूसेवेत आत्मसमर्पित व्हावे, असे ज्ञानदेव म्हणतात. **गुरूगृह जिये देशी। तो देशुचि वसे मानसी। विरहिणी का जैसी। वल्लभाते** ॥ (ज्ञा. १३:१७५)

**गुरू क्षेत्र गुरूदेवता।**
**गुरू माता गुरू पिता।**
**जो गुरूसेवे परौता।**
**मार्गु नेणे** ॥ (ज्ञा. १३:४६)

**श्री गुरूचे द्वार।**
**जे जयाचे सर्वस्व सार।** (१३:४७)

गुरू हेच माता, पिता, देवता असा निष्ठा-भाव ज्ञानदेवांच्या मनात आहे. गुरूंचे द्वार हेच त्यांचे सर्वस्वाचे सार आहे. गुरूविरहाचा एकेक क्षण त्यांना युगापेक्षा मोठा वाटतो. कै हे बिरडे फिटेल। कै तो स्वामी भेटेल। असे ते १३ व्या अध्यायात व्याकूळ होतात. मग गुरूच्या घराच्या दिशेने येणारा वाराही ज्ञानदेवांना पाहुणा वाटतो, सुखदायक वाटतो. असा विरहावस्थेत गुरूचा केवळ निरोपही आला तर तो त्यांना सुकल्या अंकुरावर पीयूषधारा पडल्यासारखा संजीवक वाटतो.

ज्ञानदेवांची अर्चनभक्ती व सख्यभक्तीही मोठी विलोभनीय आहे. आपल्या अंत:करणात प्रेमगुणांनी ते गुरूमूर्ती स्थापन करतात. स्वत:च गुरूदेवतेचा परिवार बनतात. ज्ञानाच्या चौरंगावर गुरूमूर्तीला बसवून तिच्यावर अमृतधार धरतात. बुद्धिरूपी सात्विक फुलांची तिला लाखोली वाहतात. अहंभावाचा धूप जाळून ज्ञानदीपाने ते गुरूला ओवाळतात. ऐक्यभावाचा नैवेद्य अर्पण करतात. लक्ष्मी होऊन गुरूची चरणसेवा ते करतात तर गरूड होऊन हात जोडून गुरूपुढे उभे राहतात. **ताट मी काढीन। सेज मी झाडीन। चरण संवाहन मीचि करीन** ॥ अशी मीच गुरूची सेवा करीन व त्यासाठी लागणारी सर्व उपकरणेही मीच होईन. एवढेच नव्हे तर ते पाहातील ती सृष्टी, ते चाखतील तो रस मीच होईन - असे ज्ञानदेव म्हणतात.

## मरणोत्तर गुरूसेवा

ज्ञानदेवांच्या या सख्यभक्तीचे वैशिष्ठ्य म्हणजे जीवात जीव असेपर्यंत ते गुरूसेवेचे व्रत पार पाडण्यासाठी समर्पित भावाने सेवा करतीलच पण मरणानंतरही गुरूसेवेचे व्रत पुढे चालू ठेवण्याची त्यांची दृढ धारणा आहे. म्हणूनच इये शरीरीची माती। मेळवीन तिये क्षिती। जेथ श्रीचरण उभे ठाकती। श्रीगुरूचे ॥ माझ्या पंचप्राणातील तेज श्रीगुरूंची आरती होऊन त्यांना ओवाळील, माझ्यातील आप श्रीगुरूसाठीचे पाणी होईल, माझ्यातील अपान यवरी होऊन श्रीगुरूंना वारा घालील.

ज्ञानदेवीच्या १४ व्या अध्यायात **जयजय आचार्या। समस्त सुरवर्या। प्रज्ञा प्रभा सूर्या। सुखोदया** ॥ असा श्रीगुरूंचा ते आचार्य म्हणून जयजयकार करतात. तर १५ व्या अध्यायातील नमनामध्ये जे **ज्ञानासी न चोजवे। ध्यानासिही जे नांगवे। ते अगोचर फावे। ओवी माजी** असा गुरूकृपेचा गौरव करतात. १६ व्या अध्यायात ज्ञानदेव सूर्याच्या रूपकाद्वारे गुरूसामर्थ्याचे शब्ददर्शन घडवितात. **मावळवीत विश्वाभासु। नवल उदयला चंडांशु। अब्दयाजिनीविकाशु। वंदू आता** ॥ (१५:१) **जो अविद्याराती रूसोनिया। गिळी ज्ञानाज्ञानचांदणिया। जो सुदिनु करी ज्ञानिया। स्वबोधाचा** ॥ (१५:२) एवढे मनोज्ञ वर्णन करूनही या नमनाच्या अखेरीस ज्ञानदेव म्हणतात - **लया चित्सूर्या श्रीनिवृत्ती। आता नमो म्हणो पुढतपुढती। जे बाधका येइजतसे स्तुती। बोलाचिया** ॥ (१५:१७)

सद्‌गुरू निवृत्तिनाथांचा गौरव करताना बाराव्या अध्यायात ज्ञानदेवांनी माऊलीचे तर सोळाव्या अध्यायात सूर्याचे रूपक योजलेले आहे. ही दोन रूपके कमी वाटून की काय ज्ञानदेवांनी सतराव्या अध्यायात गजेंद्राच्या रूपकाद्वारे गुरूगुणवर्णन केले आहे. **विश्वविकासित मुद्रा। जया सोडी तुझी योगनिद्रा। तया नमोजी गणेंद्रा। श्रीगुरूराया** ॥ (१७:१) अहो गुरूराया, तुमची योगरूपी माया जगतरूपी प्रफुल्लित मुद्रेला विकसित करते. त्या तुम्हा गणेंद्राला माझा नमस्कार असो. ज्ञानदेवीच्या अठराव्या, अखेरच्या अध्यायाच्या प्रारंभीही ज्ञानदेवांनी श्रीगुरूजयजयकार करणाऱ्या सुमारे २९ ओव्या लिहिलेल्या आहेत. जयजयदेव श्रीगुरो। अकल्पनारण्य कल्पतरो। श्रीगुरूचा असा जयजयकार करीत **मौनावाचुनि लेणे आंगी। सुरींना मा** ॥ (१८:२४) असे म्हणतात.

ज्ञानदेवी ही गीताटीका आहे तशीच ती **'श्रीगुरूगौरवदीपिका'** आहे. असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये, इतक्या वेळा वेगवेगळ्या रूपकांद्वारे ज्ञानदेवांनी श्रीगुरूविषयी मोठ्या जिव्हाळ्याने लिहिले आहे. गुरूकृपेचे महत्व पटवून देण्याचे त्यांचे कौशल्यही विलक्षण आहे.

# साईंची जगावेगळी माया

- वि. म. हटवार
नागपूर.

**कोणतेतरी लक्ष डोळ्यापुढे ठेवून माणूस सतत धावाधाव करीत असतो. विशेषत: विषयांकडे त्याची धाव तर अखंड असते. अशा धावाधावीतून मन स्थिर करून ते साईचरणी लावले - योग्यवेळी योग्य वाट सापडली तर जन्म सुफल-सफल होतो.**

वेदाने शक्ति-तत्त्वांस मातृस्वरूप देऊन अखिल विश्वांतील कुटुंबातील मातेच्या प्रेमास सर्वश्रेष्ठ स्वार्थरहित प्रेमाचे वरदान म्हटले आहे. माता आपल्या अपत्याचे कष्ट मिटत नाहीत तोपर्यंत दु:खी असते. सम्पूर्ण परिवाराच्या सुखांत तिचे सुख अंतर्भुत असते. आईची माया जगावेगळी वेडी असते, तशी आपल्या साईची भक्तांवर प्रेमळ माया आहे.

शिरडीक्षेत्री श्री साईबाबांचे समकालीन बाबांची नि:स्वार्थ, आंतरिक भक्तीभावाने, श्रद्धायुक्त प्रेमाने सेवा करणारी 'बायजाबाई कोते' धन्य झाली.

**आई तुझ्या रूपे,**
**दिसे मज साई ।**
**तुझे बोल सदा,**
**मला शक्ति देई ।**

**करी ऐसी धांवाधावी,**
**चित्त लावीं साईचरणी ।**
**मग तो माझा मायबाप,**
**घेईल भवताप हिरूनी ॥**

या विश्वाच्या संसारातील धावाधाव प्रत्येक जीव करतो. पण मानवांस इतरापेक्षा अधिक धावपळ आहे. तो आपले कर्म बदलू शकतो. योग्य-अयोग्याचा विचार करणारी बुद्धि माणसाजवळ आहे. इच्छित प्राप्त झाल्यासारखे दिसते तरी प्रपंचातील धाव संपत नाही. धावता धावता शिणतो, दु:खी होतो पण तरीही आशेने धावणे चालूच असते. मृगजळाप्रमाणे असणाऱ्या संसारांतील अपेक्षा पूर्ण होऊन धाव बंद पडणे कधीही शक्य नाही. म्हणून तुकाराम महाराज उपदेश करताना सांगतात -

**करीं ऐसी धांवाधावी ।**
**चित्त लावीं चरणापायी ।**

कोणतेतरी लक्ष्य पुढे ठेवून ते त्वरित गाठण्याकरितां आतुर होऊन जी जलद क्रिया होते तिला धावणे म्हणतात. कधी धावण्याचा प्रयत्न होतो पण धावत जाण्याची शक्ती नसते तर कधी साधनसामग्री नसते. तरी जीवांची विषयांकडे अखंड धाव चालू आहे. काही वेळा जीव मनाने धावत असतो. कित्येक वेळा बुद्धिही धावत असते. शरीर, मन, बुद्धि तिन्हींच्या धावण्यात फरक आहे. साधारणत: शरीर इंद्रियाद्वारें विषयांकडे धावते, मन सुखदु:खाकडे धावते आणि बुद्धि ज्ञानाकडे धावते.

## योग्य वाट धरा

संसारातील धावाधावीने कधीही दु:ख जाणार नाही म्हणून धावाधाव करणारे आपले चित्त साईचरणीं लावावे. साईचरणी चित्त लावले तर प्रपंचातील ताप निघून जाईल व मानसिक समाधान मिळेल. जेथे समाधान आहे तेथे सुख आहे. जेथे शंका आहे तेथे दु:ख आहे. जो मायबापाविषयी शंका घेईल तो या जगाचा पिता, माता, धाता म्हणजेच पालनकर्त्यावर विश्वास जर ठेवणार नाही तर दु:खहर्ता, सुखकर्ता परमात्माहि त्या पामरावर दया करणार नाही. श्री साईरामाच्या चरणी शरण गेल्यास तेच सन्मार्ग दाखवू शकतात, भ्रम दूर करून परमार्थाकडे वळवू शकतात. कुठेतरी भक्ती असेल तरच कल्याण होईल. योग्य वाट सापडली तर धावाधाव कमी होईल. श्री साईस करूणापूर्वक आळवले तर तो धाऊन येतो असा भक्तानुभव आहे. द्रौपदीने करूणायुक्त अंत:करणाने श्रीकृष्णाला आळवले तर तो धाऊन येतो असा भक्तानुभव आहे. द्रौपदीने करूणायुक्त अंत:करणाने श्रीकृष्णाला आळविले तेव्हा देवाला धीर धरवेना. तातडीने गरूडावर आरूढ होऊन निघाले पण पुढे गरूडाचाही वेग कमी वाटल्यावर त्याला तेथेच सोडून भगवान धावले व द्रौपदीची वस्त्रे पुरवून लाज राखली. असे चित्त साईचरणी स्थिर झाले पाहिजे. शरणागतांचे मस्तकावर हात ठेवून साईराम साईभक्तांचा संसार सुफल करील.

प्राणीमात्राशी साईबाबा एकरूप झालेले भक्तांनी पाहिले आहे. कोणत्याही प्राण्याची मनापासून केलेली सेवा बाबांना पोचत असे. तर्खड माईने कुत्र्यास प्रेमाने दिलेली भाकरी बाबांस पोचली हे त्यांनीच माई दर्शनास आली असतांना सांगितले. भिंतीवर चुकचुकणाऱ्या पालीची बहिण औरंगाबादेहून भेटावयास येणार हे बाबांनी सांगितले व तसेच घडले. असे अंतर्ज्ञानी अवतारी संत असतात. त्यांना प्राण्याची भाषाही अवगत होती. दरवेशाच्या मस्तवाल वाघाला श्री साईने द्वारकामाईत मुक्ती दिली.

## अंगठ्यातून गंगा-यमुना

नित्याच्या व्यवहारात आईला चार मुले असली तर ती हट्ट करतात आणि आई त्यांच्यापैकी कोणासही दु:खी करत नाही.

(पृष्ठ क्र. २६ वर)

# हे तो प्रचितीचे रिंगण

– य. वि. टिळक
डोंबिवली.

**संगे असता साई । संकटे टळती लवलाही ।**

**डोंबिवलीचे य. वि. टिळक हे श्री साईबाबांचे जुने भक्त आहेत. १९५८ साली ते शिरडीस गेले होते तेव्हा स्वत: बाबांनी त्यांना खोलीवगैरे करून दिली. त्यांना बाबांची नुकतीच आलेली प्रचिती. तो प्रसंग त्यांच्याच शब्दात देत आहोत.**

रविवार, ९ जुलै, १९९५ - आषाढी एकादशी.

माझे दोन्ही मुलगे - सुना व नातवंडे ठाण्याहून शनिवार, ८ जुलै रोजी कारने डोंबिवलीस आली होती व दुसऱ्या दिवशी सर्वजण (सातजण) दुपारी फराळ आटोपून कारनेच ठाण्यास जाण्यासाठी परत निघाली. गाडी माझा मोठा मुलगा श्री. गिरीश चालवत होता. परंतु दुपारी १-५० चे सुमारास काय घडतय हे कळावयाच्या अगोदरच सुमारे आठ दहा फूट खोल खड्ड्यात पडून उलटी झाली. मागची संपूर्ण काच व आसने बाहेर फेकली गेली. आतील सर्वजण अस्ताव्यस्त गाडीतच अडकले. मोठा मुलगा त्याच्या बाजूच्या दरवाज्याच्या फटीतून कसाबसा बाहेर आला. नंतर मोठी सून व तिचा मुलगा पाठीमागची काच निखळल्यामुळे उघड्या जागेतून बाहेर पडले.

तोपर्यंत काही लोक धावत आले. त्यांनी माझ्या दुसऱ्या मुलाचे पाय ओढून व दुसऱ्या सूनेलाही तशाच अवस्थेतून बाहेर काढले. परंतु माझी एक नात चि. स्नेहा हीची अवस्था मात्र फारच बिकट होती कारण तिचे दोन्ही पाय दरवाजाला पडलेल्या फटीतून बाहेर लोंबकळत होते तर तिचे बाकीचे शरीर आतमध्येच चेमटलेले होते. सरतेशेवटी मुलांनी व सर्वांनी मिळून तिला सुखरूप बाहेर काढली. अशारीतीने सर्वांची सुटका झाल्यावर त्यांना आपण कोणत्या दिव्यातून वाचलो याची कल्पना आली. नातवंडे अनुक्रमे आठ, सहा व पाच वर्षांची तर माझे दोन्ही मुलगे शरीराने उंच व अंगाने आडवे ! त्यामुळे गाडीतून ते कसे बाहेर आले हे अगम्य आहे. कुणालाही कसलीही दुखापत झाली नाही. गाडी उलटल्यावर तिने पेट घेतला असता तर, माझ्या संपूर्ण भावी पिढीचा अंत झाला असता. सर्वांना इतक्या अलगदपणे फुलासारखा जपून वाचवणारा कोण बरे असेल ? श्री साईनाथांनीच सर्वांना नुसतेच वाचवले नाही तर त्यांना कुठलीही इजासुद्धा पोहोचू दिली नाही कारण बाबा त्यांच्याबरोबर होते. डोंबिवलीहून निघताना नातवंडे व इतर सर्वजण दारातून बाहेर पडताना माझ्या पत्नीने – "थांबा जरा ! आम्हाला हे शिरडीला संमेलनात बाबांचे प्रत्येक पानावर छबी असलेले पॅड व बाबांचे फोटो मिळाले आहेत. तुमच्या जवळ असू देत." नातवंडांनी पॅड व विविध फोटो आनंदाने बरोबर नेले. माझी पत्नी सौ. कुमुदिनी टिळक हीने बाबांचे फोटो बरोबर घेवून जावे म्हणून दाखविलेली आकस्मित तत्परता, सहजता व समयसूचकता यामुळेच हे अटळ संकट टळले.

**संगे असता साई ।**
**संकटे टळती लवलाही ॥**

**श्री सद्गुरू साईनाथा ।**
**ठेवितो चरणी तुझीया माथा ।**

**गाईन सदैव तुझीच गाथा ।**
**तूच असशी निरंतर अमुचा त्राता ॥**

माझे वरील दोन्ही मुलगे अनुक्रमे दीड वर्षाचे व सहा महिन्याचे असताना म्हणजे १९५८ साली प्रथमच शिरडीला आलो होतो. त्यावेळीही स्वत: बाबांनी आम्हाला व माझ्या मुलांना विविध संकटातून सोडवले आहे व खोली मिळवून देण्यात व इतर बाबतीत मदत केली होती.

---

(पृष्ठ क्र. २५ वरून)

सर्वांना समान वागणूक केवळ आईच देऊ शकते. त्या सर्व मुलांचे समाधान त्यांना पाहिजे असेल ते देऊन करते. पण एखादे मूल आईच्या गळ्यास मिठी घालून म्हणते, 'आई, मला केवळ तू हवीस.' अशी स्वार्थरहित प्रेमाची भावना निर्माण झाल्यास भक्ताचे मनोरथ पूर्ण करण्याचे कार्याची तळमळ साईश्वरास असते. दासगणू महाराजांनी पर्वकाळानिमित्त गंगास्नानास जाण्याची तळमळ दर्शविताच समर्थ सद्गुरूने आपल्या पायाच्या दोन्ही अंगठ्यातून गंगा यमुनाचे जल वाहत आहे असा चमत्कार केला आणि श्रद्धावान दासगणूने ते पाणी ओंजळीत घेऊन डोळ्यावर शिंपडले आणि तीर्थ प्राशन केले. श्री साईबाबांचे गुणगान करीत असतांना दासगणूचे अंत:करण गहींवरून येई. साईमाऊलीचा प्रसाद ज्या श्रद्धावान भक्तास पावतो त्याचे जीवन सार्थकी लागते व जगावेगळ्या मायेची प्रचिती येते.

---

# ईश्वर म्हणजे काय ? तो कोठे आहे ?

- अजित य. गोसावी
बोरिवली.

**ईश्वराचे रूप व्यक्तिसापेक्ष आहे म्हणूनच म्हणतात ना 'जसे लोक तसे त्यांचे देव'. बहुतेक सर्व मूर्ती-प्रतिमा व प्रतिकांना ईश्वर मानतात. काही जण तो निर्गूण मानतात. श्री साईबाबांच्या शिकवणीनुसार ईश्वर हा प्रत्येक माणसाच्या हृदयात असून प्रत्येक मानव त्या ईश्वराचाच अंश आहे.**

**व्या**वहारीक जीवन जगताना सर्वसामान्य माणूस जीवनाविषयी विशिष्ट तत्वे बाळगून असतो. सुख, शांती, समाधान, तृप्तता, नैराश्य म्हणजे नेमकं काय ! याबाबत त्याच्या वेगळ्याच कल्पना असतात. त्याच्या जगात ईश्वराचे स्थान मूर्तीपूजेपुरते मर्यादित असते. ईश्वर म्हणजे राम, कृष्ण, शिव, दत्त असा श्रद्धेप्रमाणे ज्याच्याविषयी आदर राखला जातो असा कुणीतरी ! अशी चौकट मानवी मनात असते. फारतर ईश्वर म्हणजे निर्गुण, निराकार अशी शक्ती; एवढेच सामान्यपणे माहित असते. तर ईश्वर म्हणजे काय ही संकल्पना एवढ्यावरच संपली अशी मनोधारणा चुकीची आहे.

हे जर चूक आहे तर; ईश्वर म्हणजे काय ? असा प्रश्न निर्माण होतो. ईश्वर म्हणजे अशी गोष्ट जी दाखविता येत नाही. पैशांत जीचा आपण खरेदी-विक्रिचा व्यावहारीक विनिमय करू शकत नाही, जी आज आहे व उद्यापण आहे. थोडक्यात मानवी सामर्थ्य ज्याच्यासमोर दुर्बल पण मानवी बुद्धीला जे स्विकारावे लागले आहे असे व्यवहारातील मोजमापाच्या पलिकडील अद्वितीय, अतिभव्य, अवर्णनीय, अनाकलनीय अदृष्य तत्व म्हणजे ईश्वर होय !

## ईश्वर नियंता

ईश्वर हा दृष्य स्वरूपात अस्तित्वात नसला तरी अंशरूपाने आहे. म्हणूनच निसर्ग आणि निसर्गातील घडामोडी चालू आहेत. ईश्वर ही बाब सत्य नसेल तर निसर्गात बदल घडणार नाहीत. कोणत्याही स्वरूपात मानवी किंवा प्राणीजीवन उरणार नाही. मग हवा 'दृष्य' नाही तर हवा म्हणजे ईश्वर मानायचा का ? हवा म्हणजे ईश्वरी रूपाचा एक अंश म्हणता येईल. अशा ईश्वरी अंशरूपाने सृष्टीचा कण्नकण व्यापला आहे. '**सृष्टीचे नियमन करतो तो ईश्वर व त्याच्या योजनेप्रमाणे घडत राहते तो निसर्ग.**' हवा ईश्वरी अंश आहे जी आपणाला दिसत नाही तरी श्वासोच्छ्वास करताना ती जाणवते. तिच्याशिवाय जीवन जगणे अशक्य आहे. हवेच्या या जाणवण्यातच ईश्वरी अस्तित्व सामावले आहे. दुसऱ्या उदाहरणाद्वारे असेही सांगता येईल की, समजा आपण एखाद्याला सांगतो की अमक्या गोष्टीचा मला आनंद झाला. पण त्याने आनंद म्हणजे काय ? तो मला दाखव असे म्हटल्यास आपण अनुत्तरीत राहतो. कारण आनंद म्हणजे काय हे सांगतापण येत नाही व दाखवितापण येत नाही. पण एकप्रकारची सुखद अनुभूती, जाणीव होते. आणि हे सर्व चैतन्यमयी असते त्यामुळे तेथे ईश्वर - भगवान शंकरसुद्धा पार्वतीमातेच्या एका प्रश्नाला उत्तर देताना सांगतात की हा संसार जो आपण उघड्या डोळ्यांनी बघतो तो सत्य नसून माया आहे, जी चिरकाल टिकत नाही. तसेच आपल्या आतमध्ये सारं काही आहे असे मानतो तेही असत्य आहे. हे सारे जागृतावस्थेतील स्वप्न आहे. मग सत्य काय तर चैतन्य, चेतना ही सत्य आहे. आणि ही चेतना आहे म्हणून शरीर आहे.

तीच गोष्ट सुगंधाच्या बाबतीत सांगता येईल. सुगंध किंवा सुवास जो दिसत नाही पण जाणवतो. सुगंध काय देतो तर आनंद देतो आणि आनंद काय आहे तर आनंद हे चैतन्य आहे आणि **चैतन्य हे ईश्वरी अस्तित्वाची खूण आहे.**

मोजक्या शब्दांत सांगायचे झाल्यास व्यावहारीक जगात वावरणाऱ्या सर्वसामान्यांना ईश्वर दिसत नाही तर जाणवतो. कारण ईश्वराला पाहण्यासाठी सूक्ष्म दृष्टीची गरज असते पण आपण सर्व स्थूल दृष्टीने पाहतो म्हणून आपल्याला फक्त संसार दिसतो. ईश्वर सूक्ष्मदृष्टीने दिसतो. अशी दृष्टी एखाद्या भाग्यवंतालाच लाभते, ज्यांना आपण संतमहात्मे म्हणून ओळखतो. त्यासाठी कठोर परिश्रम घ्यावे लागतात. ईश्वराप्रत पोहोचण्याचा राजमार्ग नामस्मरणाच्या गुहेतून जातो. ज्ञानाच्या हिरेमाणकांनी खचून भरलेल्या रत्नगुंफेतील या प्रवासाच्या सुरवातीला अंधकार आहे. पण हा प्रवास जिथे संपतो तिथे सुंदर सोनेरी सकाळ उगवलेली दिसते. ही सकाळ प्रसन्न चैतन्यमयी असते. विकारांचा विटाळ नाहीसा झालेला असतो. ईश्वरी तेज दृष्टीस पडते. अशा व्यक्तिमधील सामान्यत्व लोप पावते व महत्पणा प्राप्त होतो. मग अशा महात्म्यांना लोककल्याणाची, विश्वशांतीची स्वप्ने पडू लागतात.

## संतांची ईश्वरमयता

'ईश्वर' हे ज्ञानाचे भांडार आहे. ज्ञानाची इच्छा धरली की देव दिसतो. ईश्वर हा ज्ञानाचा अथांग सागर आहे ज्याचा ठाव कुणालाही लागत नाही. या सागरात फक्त संतमहात्मे यथेच्छ संचार करतात. सर्वसामान्य माणूस मूर्तीपूजेतून स्वकल्याण व्हावे अशी अपेक्षा करतो; पण संतमंडळींचा दृष्टीकोन असा संकुचीत नाही तर लोककल्याणाचा विशाल दृष्टीकोन सामावलेला असतो. ईश्वराकडे मागण्याचा अधिकार प्राप्त झाला म्हणून ते स्वत:साठी मागत नाहीत तर इतरांसाठी मागतात.

(पृष्ठ क्र. २८ वर)

# सर्वदेवतास्वरूप श्री साई

– शाम जुवळे

**श्री साईबाबा हे सर्वदेवता स्वरूप असून अवघ्या जगाला धर्म–पंथ–जातीभेदरहित असा कल्याणाचा संदेश देणाऱ्या साईबाबांचे शिरडी मानवतेचे मंदिर आहे.**

**सा**ईसागर हे सर्व देवतांचे स्वरूप-स्थान आहे. कोणत्याही देवाला भक्ताने हाक मारली तरी ती हाक साईकानापर्यंत पोहोचते याचे कारण साई हे सर्वांचे श्रद्धा-स्थान आहे. बाबा कोणालाच हडहड करीत नसत. सर्वांवर त्यांचे प्रेम होते. सर्व प्राणिमात्रांवर ते प्रेम करीत असत. त्यांच्या नयनात आणि वाणीत प्रेमामृत ओतप्रोत भरलेले असे. त्यांची अमृतवाणी सर्वांना त्यांच्याकडे खेचून घेत असे. मधमाशा जशा मधाच्या पोळ्याभोवती गराडा घालतात त्याप्रमाणे भाविक भक्त साईसभोवती नेहमी गोळा होत असत. भक्तांना अमाप प्रेम देऊनही बाबांचा प्रेम-संग्रह नित्य वाढत राहिलेला आहे.

## अवतारी पुरुष

साईबाबांच्या आईवडिलांचा ठामपणे पत्ता कोणालाच आजवर लागलेला दिसून येत नाही. स्वत: हयात असताना बाबांनी याविषयीचा पत्ता कोणासही लागू दिला नाही. याचाच सरळ अर्थ बाबा हे प्रापंचिक पुरूष नसून अवतारी महापुरूष होते. त्यांचा जन्म प्रारब्ध-कर्माने झालेला नसून स्वत:च्या संकल्पाने जनकल्याणासाठी त्यांनी मानवदेह धारण केला होता. अशा परिस्थितीत बाबांना स्वत:चा असा विशिष्ट धर्म वा जात नव्हती. सर्व-धर्म-प्रिय असे साईबाबा होते; त्यामुळे ते सर्वदेवता-स्वरूप होते असे म्हणण्यास प्रत्यवाय येत नाही.

साईबाबांच्या इतके प्रेमयुक्त कल्याणकारी जीवन इतिहासात क्वचितच पहावयास मिळते. प्रत्येक कर्म बाबा संपूर्ण ज्ञान-जागृतीने करीत असत; अशा कर्मात फळाची आशा नव्हतीच परंतु अहंकाराची पुसटशी खुणही आढळून येत नव्हती. कर्मात वसून अकर्म साधण्याची दिव्य-कला बाबांनी जगाला स्वत:च्या जीवनावरून शिकवून ठेवलेली आहे. **साईबाबांचे प्रत्यक्ष जीवन हाच त्यांनी जगाला दिलेला दिव्य-संदेश होय.**

साईबाबांचे दिव्य जीवन म्हणजे त्यांनी जगाला मार्गदर्शनार्थ दाखविलेला प्रज्ञा-प्रकाश होता. जागृती-स्वप्न-सुषुप्ती या नेहमीच्या मानवी अवस्था ओलांडून बाबा चतुर्थ अवस्थेत (म्हणजेच तुर्यावस्थेत) नांदत होते. म्हणून जगाच्या मोहापासून बाबा संपूर्णतया अलिप्त राहिले होते. स्वत:च ब्रह्म असल्यामुळे जागतिक भ्रम त्यांना बाधा करू शकला नाही.

विश्व-मन धारण केलेले साईबाबा आदरणीय महापुरूष म्हणून आज साऱ्या विश्वाला मानवतेचा संदेश देत आहेत. शिरडी हे मानवतेचे मंदिर आहे.

---

(पृष्ठ क्र. २७ वरून)

संपूर्ण मानवजातीसाठी मागतात. कारण ईश्वरी ज्ञानाने पूर्णतया तृप्त असतात. त्यामुळे स्वत:साठी अधिक गरज भासत नाही. ते स्वत: ईश्वरमय होतात.

शिरडीचे साईनाथसुद्धा अशाच संतमहात्म्यांपैकी एक होत. त्यांनी आपल्यासारख्यांना केलेला हितोपदेश लक्षात घेतला तर त्याचा सारांश हा ईश्वर आपल्यातच आहे, परस्परांविषयी प्रेमभाव राखा, प्राणीमात्रांवर दया करा असाच आहे. संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ यांनीसुद्धा हेच सांगितले आहे. आणि या सर्व गोष्टीतून निर्माण काय होईल ? तर सारी सृष्टी चैतन्यमय होईल व ईश्वरी अनुग्रहाचा हेतू साध्य होईल.

---

## श्री साईचरणी

**रमले मन पावन गा**
**साई चरणी या**
**जीवन–मरण संपले,**
**शांती चरणी या ॥धृ॥**

**सबका मालिक एक ही अल्ला**
**राम–रहिम हा एकची सल्ला**
**फकीर धावतो भक्तापाठी**
**हित धरूनी या ॥१॥**

**चरा–चरी मी सदैव वसतो**
**दीन–धनिकांचे भाग्य पहातो**
**शरण–गताला उरी लपवितो**
**मित्र करूनी या ॥२॥**

**अवतारी मी श्रद्धेवरती**
**सबुरी असता दिव्य प्रचिती**
**भवसागर हा अलगद जावे**
**तुम्ही तरूनी–या ॥३॥**

**तु वदलासी गरिबी अव्वल**
**अमीरी से तो लाख सवाई**
**परि हिंडतो मी पृथ्वीवर,**
**अमीरी शोधत ठायी ठायी**
**हे करूणाकर, येऊन सत्वर,**
**त्वरा, हरा, विपदा या ॥४॥**

**अहंकारासी नकोस थारा**
**मी–तू पणाचा कशास तोरा**
**बंधू–भाव जप एकची**
**केवळ जीवनांत या ॥५॥**

**शिरडीच्या या अनाथ–नाथा**
**कृतार्थ झालो तूज आळविता**
**तव–पद स्पर्श तरली**
**गाथा पामराची या ॥६॥**

**– वि. रा. वेरूळकर**
**येरवडा, पुणे.**

# दत्त माझा भाव। दत्त माझा देव।

## पंत महाराज बाळकुंद्रीकर

– कृष्णा तेली
कुडाळ, सिंधूदुर्ग.

**श्री दत्तस्वरूप पंतमहाराज बाळकुंद्रीकर यांच्या 'दत्तप्रेमलहरी'तील पदे भावरम्य भक्तीकाव्य आहे. श्री साईबाबांना श्री दत्तात्रयाचा अवतार मानले जाते त्यामुळे साईभक्तांना दत्तप्रेमलहरीतील पदे निश्चितच आवडतील. त्या पदांच्या माध्यमातून पंतमहाराजाच्या दत्तभक्तीचे एक विलोभनीय दर्शन आपणास घडते.**

श्री दत्तस्वरूप 'पंतमहाराज बाळेकुंद्रीकर' यांच्या दत्तप्रेमलहरीतील पदे श्री पंतभक्तांना पूर्ण ज्ञात व परिचित आहेत. त्या पदामध्ये कोठे आत्मस्वरूप वर्णन, कोठे गुरुचरणप्रेमाची चरणसीमा गाठलेली वृत्ती, कोठे करूणापर, कोठे सद्‌गुरूची भेट ज्या ज्या वेळेला घडली त्या त्या वेळेला निघालेली पदे, अवधूत संप्रदायाचा, दृढनिश्चयाचा नि:शंक बोध अशा वेगवेगळ्या अनुभवाची पदे उपलब्ध आहेत. थोडक्यात म्हणजे, या विश्वात जे जे आहे ते ते श्रीदत्त प्रेमलहरी गाथेत अंतर्भुत आहे अशी पंतभक्तांची श्रद्धा आहे.

**दत्त माझा भाव।**
**दत्त माझा देव।**
**दत्त अनुभव।**
**अंतरीचा ॥ ३८** किंवा

**दत्ताचे पायी आम्ही**
**वस्ती केली अखंड।**
**धरीयली गोडी नामी।**
**शांती सेवू उदंड ॥३९**

या त्यांच्या पदातून दत्तस्वरूपी त्यांची अभिन्नता दर्शविते. त्यांची सद्‌गुरूपायी असलेली **'अद्वैत भक्ती'** प्रकर्षाने जाणवते. ज्यांचे जीवनच किंवा श्वासोच्छ्‌वासच पूर्ण दत्तमय झाले त्यांचेच हृदय दत्तप्रेमाने उचंबळून वाहू लागेल.

**सर्वकाळ डोळा दिसो तुझी मूर्ती।**
**योगीयांच्या पती दत्तराया ॥४४**

असे म्हणून श्री पंत केवळ दत्तापायीच सर्वकाळ वास मागतात. गुरु भजनाचा पगडा श्री पंतांवर किती होता त्याचीही प्रचिती ही पदे आळविताना झाल्याशिवाय राहात नाही. त्यांच्या दत्तगुरूभजनी मन पूर्ण रंगले। या पदात सर्व **'दत्तमय जग'** वाटते। त्यांच्या 'अद्वैतभक्तीची' ही परिसीमाच होय! संसारी जनांना दत्तभजनाचा मंत्र देताना पंत दत्तनामाचा गजर करायला सांगतात व **प्रेमळ दत्त भजन पहा। आपणा विसरूनी स्वस्थ रहा ॥** असे अभिवचनही देतात.

दत्तकृपेचे छत्र असल्यामुळे पंत निर्भय बनतात. त्यांची देही-विदेही 'दत्तमय'-स्थिती भक्तांना दत्तपदी निजशांती देते.

**आता आम्हा चिंता काय।**
**धरिले मनी सद्‌गुरू पाय ॥**

असे सांगून पंत दत्तपदी स्थिर राहातात. दत्तप्रेमाचा साक्षात्कार घडल्यामुळे दत्ताला आळविताना श्री पंत म्हणतात -

**तुझिया प्रेमा उपमा नाही।**
**म्हणूनी शरण तुझे पायी ॥**

दत्ताचे उपकार मी कधी काळी विसरणार नाही अशी आण वाहून दत्ताकडे एकच मागणे मागताना ते म्हणतात – हेचि मागणे सतत दत्ता। भजनप्रेम देई ॥ (८९७) या जन्मी दत्तगुरूसारखा तुम्हाला सखा मिळाला म्हणून तुमचे भाग्य आहे. दत्तासारखा सद्‌गुरू प्राप्त झाल्यावर जिवन्मुक्ती हाती आलीच समजावे. सद्‌गुरू दत्ताच्या दर्शनापुढे जगातील सर्व सुखे केवळ ओवाळून टाकावीत. दत्तस्वरूप हृदयी पूर्णपणे ठसल्यामुळे सर्व सुखे धावत येतात. ते म्हणतात - भक्तासाठी निशिदिनी झुरणारा सद्‌गुरू माझा आहे. माझा योगक्षेमही तोच चालवितो, मजला हाती धरून गुरुस्वरूपी तोच राखीतो –

**चरणी तुझ्या मी झालो निश्चिंत।**
**दत्तगुरुसी भजतो ॥२१०७**

असे ते म्हणतात.

सद्‌गुरूला ते (बालमुकुंद सद्‌गुरूंना) आई संबोधितात व म्हणतात -

**किती प्रेमळ सद्‌गुरू आई।**
**दीन बाळा निजपदी ठेवी ॥**

**'मीपणा'** अर्पून मी 'स्वरूपानंदी' बुडालो - एवढे ते सद्‌गुरूमय होतात. कर्मफलाबाबत ते सिद्धांत देताना म्हणतात -

**जैसी करणी तैसी भरणी।**
**दोष कुणावर ठेऊ नका ॥**

या जगात विनम्र होऊन सर्व सुखांचा धनी होता येते असे ते सांगताना दत्तापायी

(पृष्ठ क्र. ३१ वर)

# राष्ट्रकार्यात अग्रेसर संत
# पाचलेगावकर महाराज

**मराठवाड्यातील संत पाचलेकर महाराजांचे राष्ट्रकार्य व समाजकार्य सर्व भक्तीमार्गीयांनी अनुकरण करावे असेच आदर्श आहे. पंथभेद-धर्मभेद न मानता अवघा मानव एक म्हणत त्यांनी केलेले कार्य श्री साईबाबांच्या कार्याप्रमाणेच मानवतावादी आहे. पाचलेकर महाराजांच्या निर्याणाला नुकतीच नऊ वर्षे होत आहेत त्यानिमित्त त्यांचे पुण्यस्मरण -**

गुरूमहिमा शब्दात वर्णन करणे किंवा गुरूचरित्र शब्दात लिहिणे केवळ अशक्यच आहे. कारण गुरूमहिमा हा अनंत आणि अविनाशी अमर आहे. परंतु गुरूकृपेने काही शब्दात गुरूचा महिमा वर्णन करण्याचा अल्पसा प्रथम प्रयत्न मी करीत आहे. **''जगाच्या कल्याणा संताच्या विभूती देह कष्टविती परोपकारे''** ह्या उक्तीला सार्थ यथार्थ करण्यासाठीच जणूकाही परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्यात पाचलेगाव ह्या गावी पाचलेगावकर महाराजांचा जन्म झाला. धर्मशील व परोपकारी असे राजारामपंत कुलकर्णी आणि अत्यंत सात्विक, प्रेमळ, श्रद्धाळू अशा कृष्णाबाई हे महाराजांचे मातापिता.

## माधवाश्रम स्वामींचे भाकित

या बालकाचा जन्म होण्यापूर्वी काही दिवस आधी पाचलेगावी एक थोर योगी महात्मे आले होते. त्यांचे नाव माधवाश्रम स्वामी. ते अजानबाहु, तेजस्वी, पुराणपूरूषासारखे दिसत. त्यावेळी त्यांचे वय १०५ वर्षाच्या वरच होते. त्या स्वामींचे वास्तव्य दत्तवाडी ह्या मराठवाड्यातील एका गावी होते. ते फिरत फिरत राजाराम पंताकडे आले व त्यांनी भिक्षा मागितली. कृष्णाबाई भिक्षा घालण्याकरिता समोर आल्या त्यावेळी माधवाश्रम स्वामींनी सांगितले की, तुमच्यापोटी एक महान तेजस्वी बालक जन्माला येणार असून त्या बालकाच्या पूर्व जन्मीपासून आमचा त्यांच्याशी ऋणानुबंध आहे, असे सांगून स्वामी निघून गेले. यथावकाश दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पहाटे पाच वाजता (८ नोव्हेंबर, इ.स. १९१२) या बालकाचा जन्म झाला.

त्याचे पाळण्यातील नाव नृसिंह असे ठेवण्यात आले. आणि खरोखरीच महाराज साक्षात नृसिंहासारखेच दिसत. ठेंगणी मूर्ती त्या मानाने खांदे व छाती रूंद, मोठा व उग्र भासणारा चेहरा, व त्यावर दाट दाढी, मानेवर रूळणारे लांब केस, भव्य कपाळ व अत्यंत तीक्ष्ण दृष्टी असे त्यांचे रूप होते. चिडले म्हणजे ते साक्षात नृसिंह अवतार धारण करीत परंतु मनातून मात्र ते सर्वावर खूप प्रेम करीत. महाराजांना अंगावर कपडे घालणे कधीच आवडले नाही. ते सदैव लंगोटी धारण करीत. कधीकधी शिष्यगण त्यांना भगवी छाटी देत असत. छोट्या नृसिंहास शाळेत जाणे मुळीच आवडत नसे कारण शाळेत जे शिकविले जाई ते सर्वच त्यांचे मुखोद्गत असे. त्यामुळे नृसिंह शाळेत न जाता कधी एकटाच तर कधी सवंगड्यासहीत रानावनात जाई. तेथे जुन्या जीर्ण मंदिरात शिवलिंगाची तासनतास पूजा करी. कधी गांवाबाहेरील गुहेत जाऊन तासतास बसे. सवंगड्यांना सोबत घेतल्याशिवाय नृसिंह कधीही एकटा खात नसे. ही सवय त्यांची शेवटपर्यंत होती. त्यांना लहान मुले खूप आवडत.

## प्रसंग छोटा अर्थ मोठा

नृसिंह बाळ तेंव्हा पाच/सहा वर्षाचा असेल. नागपंचमी आली व आई मातीच्या नागाची पूजा करू लागली, हे बघून नृसिंह गांवाबाहेरील रानात गेला व तेथील वारूळातून एक नाग पकडून आईपुढे आणून टाकला. आई व पूजा करणाऱ्या इतर बाया घाबरून दूर पळाल्या. शेवटी नृसिंहानेच त्या नागाची पूजा केली व त्याला परत वारूळात नेऊन सोडले. त्यावेळेपासून सर्व लोकांना बाळ नृसिंहाच्या अलौकिक सामर्थ्याची कल्पना आली. पुढील आयुष्यात अगदी शेवटच्या क्षणापर्यंत महाराजांनी कुणाला साप, नाग चावल्यास त्याचे वीष उतरविणे, सापाविषयीच्या भ्रामक कल्पना दूर करणे ह्या विषयीचे बरेच कार्य केले. मोठमोठ्या विज्ञानवर्धक संस्थांमध्ये त्यांची सर्पवीष ह्या विषयावर भाषणे होत असत.

चमत्कार याविषयी त्यांचे मत असे होते की, पंचमहाभूतात सृष्टीतच सगळे चमत्कार भरले आहेत. फक्त त्या त्या विषयीचा खोल अभ्यास तपश्चर्या केली म्हणजे माणसाला त्यामागील कारण मिमांसा कळते. लोकाच्या दृष्टिने तो चमत्कार करू शकतो. असो. पुढे बाळ नृसिंहाची मुंज झाली. त्यानंतर पुन्हा माधवाश्रमस्वामी पाचलेगावी नृसिंहाचे घरी

आले. त्यांनी त्या बालकावर आवश्यक ते बीजसंस्कार केले. त्या बालकास आपला मागील जन्म व आपण कोण आहोत याचे ज्ञान प्राप्त व्हावे व आपल्या मागील जन्मात अपूर्ण राहिलेल्या कार्याला पूर्ण करण्यासाठी त्याने लागावे या इच्छेने स्वामींचा जीव तळमळू लागला. स्वामींनी छोट्या नृसिंहास सर्व सांगितले त्यानंतर त्यांचे मन घरात लागेना. वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी अंगाला घराच्या मातीचे भस्म लाऊन व अंगावर केवळ एक लंगोटी लावून हे बालक घराबाहेर पडले.

## राष्ट्रकार्यात अग्रेसर

लोक त्याला 'संचारेश्वर महाराज' किंवा 'संत पाचलेगावकर महाराज' म्हणून ओळखू लागले. **महाराजांनी ठिकठिकाणी ज्ञानयज्ञ सुरु केले. पारतंत्र्याच्या त्या काळात जनजागृती करून लोकामध्ये स्वातंत्र्याची ज्योत जागृत केली.** ठिकठिकाणी गोरगरीब अनाथ, पंगु, रोगी ह्यांना अन्नछत्र घालून सहस्त्रभोजने केलीत. गरीब अडाणी लोकांना महाराज त्यांच्या भाषेत त्यांना समजणारी भाषणे देवून त्यांच्यातील धर्मभोळेपणा, अंधश्रद्धा ह्यापासून परावृत्त करीत. **महाराज सांगत की, सर्व धर्माची मुळ तत्वे एकच आहेत. सर्व धर्मीयांचा परमेश्वर एकच आहे. भेद आहे तो माणसांत. माणसानेच जातीधर्मात भेद निर्माण केला. ते स्वत: जाती धर्मभेद मानीत नसत.** सुशिक्षित वर्गात त्यांनी आधुनिक सायन्स, चमत्काराचे मूळ, अंधश्रद्धा, अंधविश्वास ह्यावर वैज्ञानिक दृष्टीकोनातून भाषणे केलीत. जुन्या ग्रंथांचा इतिहासाचा आधूनिक सायन्सशास्त्र व समाजरचना ह्यांच्याशी सांगड घालून केलेल्या भाषणांचा सुशिक्षित मोठमोठ्या व्यक्तींच्या मनावर पगडा बसला. सावरकर, गांधीजी, नेहरू, इंदिरा गांधी, गुलझारीलाल नंदा ह्या व अशा अनेक सुशिक्षित मान्यवर व्यक्तिंचा त्यांच्याशी संबंध आला.

## समाजकार्य

महाराजांनी गोरगरीबासाठी अन्नसत्र, अनाथाश्रम, बालकाश्रम काढले. भूतबाधा, भानामती ह्या मानसिक विकृतीपासून हजारो लोकांची विनामूल्य सुटका केली. सर्पविषबाधेपासून त्यांनी अनेक लोकांना जीवदान दिले. अनेक लोकांच्या सहाय्याने श्रमदानाने त्यांनी रस्ते बांधले, तलाव, विहिरी खोदल्या, धर्मशाळा बांधल्या. या त्यांच्या श्रमदानात अनेक मोठमोठ्या मान्यवर व्यक्ती सामील होत. भूदानयज्ञ **करून त्यांनी गरीबांना जमीनी मिळवून दिल्या.** दुसऱ्यांचे शारिरीक रोग प्रारब्ध भोग महाराज स्वत:वर ओढून घेत. त्यामुळे त्यांचे शरीर अशक्त झाले. सतत श्रम, आजारपण व वार्धक्य याचा परिणाम असा झाला की, महाराज खूप थकले तरीही त्यांचे ठिकठिकाणी देशभर दौरे, भाषणे व लोककल्याणाचे कार्य सुरूच होते. देहाची मर्यादा संपत आली होती पण कार्य करण्याचा उत्साह संपला नव्हता. साधूसंत काय किंवा देव काय देह त्यांना योग्य वेळी त्याग करावाच लागतो. ती वेळ जवळ आली व महाराज सारखे म्हणू लागले ''अरे आता या देहाचा भरोसा नाही.'' मुंबई मुक्कामी तारीख १६ ऑगष्ट, १९८६ शुद्ध एकादशी रोजी धर्मभास्कर संत श्री संचारेश्वर पाचलेगावकर महाराज यांनी आपल्या नश्वर देहाचा त्याग करून ते पंचमहाभूतात विलीन झाले.

---

(पृष्ठ क्र. २९ वरुन)

'मीपणा' अर्पिताना दिसतात. त्यासाठी ते....

**प्रेमवृत्ती मांडारे ।**
**मिरवा अवधूत झेंडारे ॥**

असे गर्जून सांगतात.

कोणतीही सेवा न करता आपला सद्‌गुरू आपले रक्षण-सांभाळ करतो ही दृढ श्रद्धा श्री पंतांनी जोपासली म्हणूनच ते दत्तपदी निमाले !

आरती करताना काय करावे हे भक्तजनांना सांगताना ते म्हणतात -

**मीपणा टाकुनी ओवाळीता**
**भोगिले स्वानंदा ।**
**आरती माझ्या बालमुकुंदा ॥**

**अहंभाव टाकणे हीची**
**सद्‌गुरूप्रती खरी आरती ।**
**प्रेमाची आरती ।**
**गुरुसी प्रेमाची आरती ॥**

निरांजने-धूप-दिप ही आरती नसून द्वैताद्वैताची वाती जाळून स्वयंज्योती स्फुरते ती आरती ! असे श्री पंत बोध करतात.

सद्‌गुरू आपणापाशी कसा असतो ते म्हणतात -

**क्षणोक्षणी विसरतो तुजला ।**
**परी राखिसी निशिदिनी मजला ॥**

दत्ताला तुम्ही विसरला असे म्हणालात तरी तुम्हाला तो संकटकाळी जरूर येणार. कारण तो या चराचरी सर्व व्यापून उरला आहे. शेवटी पंत, शेवट गोड करी दत्ता म्हणताना मागणी एकच करीतात - **नलगे मुक्ती । नको विरक्ती । भजनी प्रीती भरी । दत्ता । धरी मज प्रेमे करी ॥ १५४५**

या दत्तभक्तीचे संजीवन श्री पंतांनी सर्वांना भरभरून दिले ते प्राशून आम्ही शांतीसुख अनुभवूया एवढीच मागणी श्री दत्ताठायी आहे.


---

# शिरडीवृत्त

**माहे एप्रिल :**

**चैत्र पाडवा आणि रामनवमी उत्सवाच्या चैतन्याने बहरलेल्या या महिन्यात शिरडी येथे परंपरेनुसार अखंड पारायण, कीर्तन, मिरवणूक आणि कुस्त्यांचा फड आदी भरगच्च कार्यक्रम झाले.**

**या महिन्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री. गोपीनाथ मुंडे, दुग्धविकास मंत्री श्री. नारायणराव राणे आदी मान्यवरांनी श्री साईबाबांचे दर्शनार्थ शिरडी संस्थानला भेट दिली.**




रामजन्मोत्सवाचा मनोहर देखावा

**चै**त्र शुद्ध-१ युवनाम संवत्सरारंभ, गुढी पाडव्याचा शुभ दिवस होता. माहे मार्च-९५ संपून चैत्र महिन्याचा कडक उन्हाळा भासु लागला. या शुभदिनी साईबाबा संस्थानतर्फे मा. अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकरसाहेब, यांचे हस्ते **'दैनंदिनी'** (१९९५-९६)चे प्रकाशन श्रींचे मंदिरात करणेत आले. संपूर्ण माहितीने ओतप्रोत अशी दैनंदिनी सभासदांना मोफत वाटण्यात आली.

मार्चचे शेवटच्या आठवड्यात राहिलेल्या परिक्षांचा प्रारंभ झाल्यामुळे शिरडीस येणाऱ्या भक्तांची गर्दी अल्पशीच होती. श्री साईबाबा संस्थानतर्फे श्री रामनवमीचा उत्सव चैत्र शुद्ध अष्टमीपासून ८ ते १० एप्रिल असा साजरा करण्यात आला.

## अखंड पारायण

दि. ८-४-९५ रोजी श्रींच्या रामनवमी उत्सवाचा पहिला दिवस होता. दरवर्षी प्रथेनुसार श्रींची काकड आरती झाल्यानंतर श्रींचे फोटोची मिरवणूक गुरूस्थानमार्गे निघून द्वारकामाईत श्रींचे फोटोची स्थापना करण्यात आली. त्याचवेळी श्री साईसचरित्राचे अखंड पारायणास प्रारंभ झाला. मा. अध्यक्ष श्री. सुकथनकरसाहेब यांनी अध्याय वाचून पारायणाचा श्रीगणेशा केला. या कार्यक्रमास बरेच विश्वस्त सदस्य हजर होते. सायंकाळी ८-०० वाजता सुप्रसिद्ध गायक कलाकार श्री. अजय चक्रवर्ती यांचे सुश्राव्य गायनाचा कार्यक्रम झाला. बऱ्याच साईभक्तांनी गायनाचा आनंद लुटला



चित्ताकर्षक विद्युत रोषणाई



अखंड पारायणाचा श्री साईसच्चरितातील पहिला अध्याय वाचून श्रीगणेशा करताना संस्थानचे मा. अध्यक्ष श्री. द. म. सुकथनकर

दि. ९-५-९५ रोजी चैत्र शुद्ध नवमी श्री रामनवमी उत्सवाचा प्रमुख दिवस होता. मंदिरातील सर्व नित्य नैमित्तिक धार्मिक कार्यक्रम चालू होते. उत्सवामध्ये अभिषेक व सत्यनारायणपूजा बंद होत्या. सर्व येणाऱ्या कलाकारांना भक्तांसमोर हजेरी देणेकामी श्रींचे मंदिर रात्रभर उघडे होते. बऱ्याच गायक कलाकारांनी व सनई वादनकारांनी आपली हजेरी लावली.

## आकर्षक विद्युतरोषणाई

संस्थानचे सर्व परिसरात मुंबई येथील श्री द्वारकामाई मंडळ, यांनी संपूर्ण नगर-मनमाड रोडवर बस स्टॅण्डपासून रंगीत लाईट लावून रोषणाई केली होती. तसेच संस्थानचे आतील प्रत्येक मार्गावर निरनिराळे हलते देखावे करण्यात आले होते. संस्थान हद्दीतील सर्व मंडप गेट व गुरूस्थान, चावडी, द्वारकामाई तसेच श्रींचे समाधीमंदिर व संस्थानचे इतर कार्यालयांवर सुंदर अशी विद्युत रोषणाई केली होती. प्रेक्षणीय असे धार्मिक प्रसंगाचे हलते देखावे व विद्युत रोषणाई पाहून भक्तांचे मन थक्कच होत होते.

## कीर्तनाची बहार

श्रींच्या उत्सवाचा तिसरा दिवस सोमवार (१०-४-९५) होता. सदर दिवशी परंपरेप्रमाणे दहीहंडीचा कार्यक्रम झाला. कीर्तनास ठीक सकाळी १०-३० वाजता प्रारंभ झाला. सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. मनुमहाराज कोकलेगांवकर, यांनी आपल्या रसाळ भाषेतून रामजन्माचा वृत्तांत कीर्तनातून सांगितला. त्यांचे मधूर वाणीने सर्व साईभक्त भारावून गेले होते. मंदिरासमोरील सर्व परिसर भक्तांनी गच्च भरला होता. ठीक ११-४५ वाजता श्री मनुमहाराज यांनी श्री रामजन्माचे आख्यान संपविले. श्रींचे मंदिर परिसरातील दहीहंडी फोडण्यात आली. सर्व साईभक्तांनी एकच गर्दी करून हंडीचा प्रसाद मिळविला. ठीक १२-०० वाजता माध्यान्ह आरतीस प्रारंभ झाला.

## कुस्त्यांचा फड

उत्सवाच्या शेवटच्या दिवशी साईनगर येथील प्रांगणात कुस्त्यांचा फड उभारण्यात आला होता. शिरडी येथील स्थानिक कार्यकर्ते, प्रशासकीय अधिकारी, विश्वस्त, यांनी कुस्त्यांची जोड लावली, व नामवंत अशा पैलवानांना योग्य ते मानधन दिले.

## अपंग तपासणी शिबीर

याच महिन्यात दि. १०-४-९५ ते १७-४-९५ अखेर संस्थानची नवीन भक्तनिवासस्थान या इमारतीत अपंग शिबीर आयोजीत करण्यात आले होते. त्यात जयपूर फूट मोफत वाटप करण्यात आले. श्री साईबाबा संस्थान, शिरडी व जामखेड येथील डॉ. रमाकांत आरोळे, यांचे सहकार्याने हे शिबीर घेण्यात आले. शिबीराचा समारोप, मा. विश्वस्त आण्णासाहेब म्हस्के, (माजी मंत्री) यांनी केला. डॉ. पाटील (मुख्य वैद्यकीय अधिकारी) व त्यांच्या सहकाऱ्यांनी शिबीर



ह.भ.प. मनुमहाराज यांच्यासमवेत फुगडी घालताना विश्वस्त अण्णासाहेब म्हस्के आणि कीर्तनानंदात डुंबलेला श्रोतृवर्ग

यशस्वी करण्यासाठी बरेच कष्ट घेतले.

### मान्यवरांच्या भेटी

या महिन्यात खालील अतिमहत्वाचे व्यक्तींनी शिरडी संस्थानला भेट दिली व श्री बाबांचे दर्शन घेतले.

मा. खासदार शिवराम चव्हाण, भोपाळ (मध्यप्रदेश),

सौ. हंसाबेन/जयदेव, योगतज्ज्ञ,

मा. खासदार श्रीमती उषा राजे, लोकसभा सदस्य,

श्री. पांडेसाहेब, ॲडीशनल डी.आय.जी.,

मा. श्री. मजेठीया, मुंबई हायकोर्ट,

मा. श्री. जाधवृसाहेब, जॉईंट डायरेक्टर, ग्राऊंड वाटर सर्व्हे, पुणे,

श्रीमती जमुनादेवी, आरोग्य खाते,

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. गोपीनाथजी मुंडे,

श्री. रवी मिश्रा, खासदार (बिहार),

मा. श्री. मधुकरराव दिघे, गव्हर्नर, मेघालय,

मा. श्री. के. व्ही. प्रसाद, डेप्युटी कमिशनर ऑफ पोलिस (आं.प्र.),

श्री. पंडासाहेब, सचिव, तामिळनाडू सरकार, मद्रास,

मा. नारायणराव राणे, दुग्ध विकासमंत्री, महाराष्ट्र राज्य,

श्री. एम. एल. दर, लेफ्टनंट जनरल.

## साई सत्संग

साई सत्संगाचे भाग्य लाभले,
भरल्या संसारी।
साई भक्तीची ज्योत तेवो,
माझ्या घरकुली ॥धृ॥

कर्तव्याने कर्म करावे,
तुझीच ही सेवा।
नाम घेऊनी करीत राहिले,
प्रपंच हा देवा।
माया तुमची साई देवा।
खेळ तुझा न्यारा।
प्रपंचातून परमार्थ शिकवी,
साई राम प्यारा ॥१॥

साई सत्संगाचे भाग्य लाभले।
श्रद्धा, सबुरीची वल्हे हाती,
भवसागर तरण्या।
खडके, भवरे टळून गेली,
तुझीच ही करूणा।
दूर किनारा आहे अजुनी,
भक्ती दे रामा।
भावभक्तीच्या नौकेतून,
नेई पैलतीरा ॥२॥

साई सत्संगाचे भाग्य लाभले।
कृतज्ञतेने वंदन करीते,
ऋणी तुझी साई।
आहे आश्रित नाथा तुझी मी,
होऊ कशी उतराई।
मूढमती मी लेक तुमची,
सांभाळून घ्यावी।
भावफुलांची माला ही,
अर्पियली पायी ॥३॥

साई सत्संगाचे भाग्य लाभले।

– शांता अं. सरोदे
दादर, मुंबई.



रामनवमी उत्सवाच्या निमित्त झालेल्या कुस्त्यांमधील एक कुस्ती लावताना संस्थान प्रशासन अधिकारी श्री. चावकसाहेब

# श्री साईनाथ हॉस्पिटलद्वारे घेण्यात आलेले विविध उपक्रम



मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराच्या उद्‌घाटनप्रसंगी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पाटील मनोगत व्यक्त करताना.



श्री साईनाथ हॉस्पिटलद्वारे घेण्यात आलेल्या चिकित्सा शिबीरातील एक दृश्य.



एका रुग्णाचे डोळे तपासताना नेत्रतज्ज्ञ, त्यांच्या मागे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. पाटील.

# श्री साईबाबांचे कीर्तनोपयोगी
## चरिताख्यान

रचयिता – सरस्वती कवि
मो. बा. खंदे (काव्यतीर्थ)

(१) श्लोक (उपजाती)

श्रीमच्छुकाचार्य कबीर–रूपे।
येती हराया जन–दुःख–पापे ॥
पुनश्च त्यांचा अवतार होई।
शिर्डीमधे घेउन नाम साई ॥

(२) आर्या

लग्नवरातीसंगे येती
श्री साईनाथ शिर्डीत।
नाव गाव परि त्यांचे
झाले नाही मुळी कुणा ज्ञात ॥

(३) दिंडी

कुण्या भक्ताने सहज बोललेले।
नाव 'साई' जे तेच रूढ झाले ॥
नामरूपातील या अनन्ताते।
नाव देता येईल बा कसे ते? ॥

(४) आर्या

होती एक पुराणी जीर्ण
अशी ती मशिद गावात।
वापर नसे जियेचा होता बहु केर
साचला आत ॥

(५) दिंडी

मशिद त्यांनी झाडून स्वच्छ केली।
गोमयाने ती लख्ख सारविली ॥
पेटवुनिया ठेविली धुनी तेथं।
आणि केलासे दीप प्रज्वलित ॥

(६) ओवी

या ऐशा त्या मशिदीत।
मुक्काम करिती साइनाथ।
नाम हरीचे मुखी घेत।
भिक्षा गावात मागती ॥

(७) साकी

अंगी कफनी, हाति कटोरा,
काखेमाजी झोळी।
शिरी बांधिला सफेद कपडा
शोभे गंध कपाळी ॥
निशिदिन छंद मुखा।
"अल्ला मालिक सबका" ॥

(८) पद (वैष्णव जन तो.)

एक अल्ला है मालिक सबका
सुमिरन उसका नित्य करो।
वह ही सबका भला करेगा
मन में यह विश्वास धरो ॥ ध्रु०॥

भरा हुआ है वह घट घट में।
बात न उसबिन बनती है।
भेद–बुद्धि ही उससे प्यारे।
दूर हमेशा रखती है ॥

सच्चाई की चलो राह पर,
संतन के भाई पग पकरो।
एक अल्ला है मालिक० ॥१॥

कोई किसी का नहीं दुनिया में।
चार दिनों का मेला है।
आना है रे यहाँ अकेले।
जाना भी तो अकेला है ॥

नरतन नहीं यह बार बार से
बात कभी ये मत बिसरो।
एक अल्ला है मालिक० ॥२॥

(शिरडीत श्री साईबाबांनी अनेक चमत्कार करून दाखविले.)

(९) पद (त्यालाच अशा वेशाची)

पणत्यात घालूनी पाणी
अगणित दीप लाविले।
देऊन उदी–अंगारा
कित्येक रोग वारिले ॥
लटकली लाकडी फळी।
रूंद वितभरी।
निजति तीवरी।
जाऊनी राती।
प्रत्यक्ष लोक पाहती ॥१॥

निज कृपा–कटाक्षे कैका
संकटातुनी तारिले।
वारिले वांझपण ज्यांनी
कैकास देउनी मुले ॥
हे असे योगसामर्थ्य।
पाहुनी तेथ।
लोक अत्यंत।
चकित मनि होती।
श्री साईपदा वंदिती ॥२॥

(१०) आर्या

श्री साईबाबांची यापरि
पसरे चहुकडे कीर्ती।
अगणित भक्त जहाले,
लांबुनिही लोक दर्शना येती ॥

(११) ओवी

नानासाहेब चांदोरकर।
भक्त श्रीमंत उदार।
शिर्डीत येती निरंतर।
साईबाबांसी वंदावया ॥

(१२) श्लोक (उपजाती)

'गणेश दत्तात्रय' नाम ज्याते।
'सहस्त्रबुद्धे' कुळी जन्म झाला ॥
शिर्डीस येती सहजी पहा ते।
नानाचिया मानुनि आग्रहाला ॥

(१३) आर्या

गणेश दत्तात्रय हे पोलिस खात्यात
नोकरी करती।
दिव्य विलक्षण ऐशी काव्य–प्रतिभा

जयास लाभत ती ॥

(१४) दिंडी

तमाशाचा अति छंद असे ज्यास।
रचिति छक्कड, लावणी, पवाड्यास ॥
भडक शृंगारिक काव्य हे तयांचे।
मनापासुन आवडे जनां साचे ॥

(१५) पृथ्वी

तदीय कवनास या
म्हणत उच्च ताल-स्वरी।
तमासगीर, गोंधळी,
बहुत रंगती अन्तरी ॥
डफातुणतुण्यावरी वहरता
अशी लावणी।
कळे न कशी रात ही
त्वरित जातसे संपुनी ॥

(श्री नानासाहेब चांदोरकरांनाही तमाशाची विशेष आवड होती. त्यामुळे श्री दासगणूंचे व त्यांचे अत्यंत सख्य होते. केवळ श्री नानांमुळेच दासगणू चार-दोन वेळा शिरडीस आले होते. श्री दासगणू तमाशासाठीच काव्य करीत असले तरी -)

(१६) आर्या

काव्यहीन शृंगारिक भवती
निकृष्ट लोक तेवि सदा।
अधम चाकरी तरिही त्यजिली
ज्यांनी न नीति-मर्यादा ॥

(श्री गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे यांचे गुरू होते श्री वामनशास्त्री इस्लामपूरकर. ते परमार्थाचे मोठे अधिकारी असून सरकारी अधिकारीही होते. त्यांची व श्री दासगणूंची योगायोगाने गाठ पडली आणि दासगणूंच्या जीवनाला वेगळेच वळण लागले.)

(१७) पद (रजनीनाथ)

अधिकारी जे परमार्थाचे।
वामनशास्त्री नाव जयांचे ॥धृ०॥
घेउनिया त्यांचा उपदेश।
गणेश झाले श्रीगणुदास।
गुरूप्रसादे तत्प्रतिभेस।
फुटती अंकुर सद्भक्तीचे।
अधिकारी० ॥१॥

(१८) दिंडी

लाभ होता सद्गुरूंच्या कृपेचा।
नाद सुटला संपूर्ण तमाशाचा ॥
लावणीच्या टाकून ग्राम्य-मार्गा।
वळे भक्तीच्या प्रांति काव्यगंगा ॥

(१९) ओवी

सद्गुरूचा सहवास।
अल्पकाळ मिळे ज्यास।
शास्त्रीबुवांनी काशीस।
जाऊन देहा ठेवियलें ॥

(ज्ये. व. ११ शके १८१८ हा श्री वामनशास्त्रींचा पुण्यतिथीचा दिवस. देह ठेवण्यापूर्वी बरेच दिवस आधी त्यांनी तशी कल्पना श्री दासगणूंना दिली होती. सद्गुरूच्या विरहकल्पनेने ते अतिशय व्याकूळ झाले. त्यांना समजावितांना श्री शास्त्रीबुवा म्हणाले -)

(२०) पद (जा शरण गुरूसी आता रे०)

शिर्डीस इथुन तू जाई ॥धृ०॥
साईबाबा योग्य विभूती।
मार्गदर्शना करतिल तुजप्रति।
तेच गुरू तुज आता पुढती।
मनि शंका नच घेई।
घेई। शिर्डीस० ॥१॥

एकरूप की आम्ही निरंतर।
दोघामाजी मानि न अंतर।
शरण साइला जाउन सत्वर।
ठेव पदी त्या डोई।
डोई। शिर्डीस० ॥२॥

(२१) श्लोक

श्री सद्गुरूच्या वचनानुसार।
शिर्डीत तेव्हा गणुदास येती ॥
साईपदीं त्या शिर ठेविती ते।
अनन्यता भाव धरोनि चित्ती ॥

(त्यांनी आपला अनन्यता भाव अनेक ठिकाणी प्रकट केला. पुढे तर ''शिर्डी माझे पंढरपुर। साईबाबा रमावर'' । असे म्हणून त्यांनी आपली निष्ठा व्यक्त केली आहे.)

(२२) साकी

बाबांचा सहवास मिळो
ही स्वमनी ठेउन आस।
मधुनी मधुनी शिर्डीलागी
येती श्री गणुदास ॥
क्वचिदपि मग तेथे।
कीर्तनही करिती ते ॥

(एकदा श्री साईबाबा श्री नानासाहेब चांदोरकरांना म्हणाले -)

(२३) श्लोक (स्रग्धरा)

नाना संतांस साऱ्या गुरूवर
वदती घाल जेवावयास।
त्यांना बोलावण्याचे अवघड
अति जे काम दे या गणूस ॥
पुण्याचे काम हे बा मग
करशिल ना! तूं गणू एवढे रे।
जन्माचे या तुझ्या की खचित
करिल तो देव कल्याण सारे ॥

(श्री दासगणूंनी श्री बाबांच्या या म्हणण्याचा आशय ओळखून संतचरित्रे लिहिण्यास प्रारंभ केला. संतचरित्रांची माहिती मिळविण्यासाठी ते अनेक ठिकाणी जाऊ लागले. क्वचित प्रसंगी बाबाही त्यांना अमुक ठिकाणी जा, असे सुचवित असत. भक्तिलीलामृत लिहिण्यास सुरवात झाली. आता बाबा त्यांना नोकरी सोडून दे, असे सांगू लागले. ते त्यांना म्हणाले -)

(२४) साकी

ऐक गणू तू माझे इतुके
सोड नोकरी बा ही।
लोकांचे या बूट पुसाया
जन्म आपला नाही।
माझे ऐकावे।
निजहित तू साधावे ॥

(तरीही त्यांनी मनावर घेतले नाही. उलट ते म्हणाले, ''बाबा, नोकरी सोडण्याचा आग्रह का करता? या नोकरीमुळे गोळाभर अन्न खावयास मिळते ती नोकरी सोडून कसे करू?'' बाबा म्हणाले, ''मी जे सांगतो ते तुझ्याच हिताचे

आहे. तू नोकरी न सोडशील तर पस्तावशील.'' असा धमकीवजा इशाराही दिला. श्री नानासाहेब म्हणाले, ''गणपतराव, बाबांची आज्ञा मोडू नका. मी दरमहा तुमच्या पगाराएवढी रक्कम तुम्हास देत जाईन.'' पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. उलट बाबांसमोर जाण्याचे ते टाळू लागले. एकदा तोंड चुकवून जाताना बाबांनी त्यांना रस्त्यातच गाठून म्हटले -)

**(२५) पद** (विनती ही एक माझी०)

**जाशिल तू सांग कोठे ।**
**निजमुख ते लपवुनी? ।**
**कथितो मी तव हिताचे ।**
**नोकरी दे सोडुनी ॥ध्रु०॥**

(अंतरा) **पस्तावा पावशिल रे ।**
**जर नच हे मानिसी ॥**
**वदतो रे काय मी हे ।**
**मनि घेई समजुनी ॥** जाशिल० ॥१॥

(अंतरा) **पोटाची काळजी या ।**
**करशी का व्यर्थ तू ॥**
**आहे रे सर्व चिन्ता ।**
**भगवन्ता लागुनी । जाशिल० ॥२॥**

(तरीही बाबांच्या म्हणण्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले. आणि मग विलक्षण घटना घडली. अकोट येथील श्री नरसिंग महाराजांची माहिती मिळविण्यासाठी ते नेवाश्याहून परस्पर आकोटास गेले. जाताना त्यांनी आपले घोडे, पोलीसाचा ड्रेस, डायरी वगैरे निपाणी वडगाव येथील कुलकर्ण्याच्या घरी ठेवले होते. परत येण्यास त्यांना २/३ दिवस लागले. या काळात त्यांच्या अधिकार क्षेत्रातील सातेगाव, भालगाव येथे मारवाड्याच्या घरावर डाका पडून त्यात मारवाडी ठार झाला. हजारो रुपयांची संपत्ती लुटली गेली. त्यांच्या हाताखालील शिपायाने ''जमादार बेलापूर स्टेशनहून कोठेतरी निघून गेले'', अशी चाहडी केली.)

**(२६) श्लोक** (अनुष्टुप)

**ध्याया संतचरित्रांची माहिती,**
**फिरती सदा ।**
**त्यासाठीच गणू गेले**
**आकोटाप्रति एकदा ॥१॥**

**कार्यालयीन कामार्थ**
**असता फिरतीवरी ।**
**नेहमीसारखे तेव्हां**
**गेले होते परस्परी ॥२॥**

**अधिकृत रजा त्यांनी**
**नसे अर्थात घेतली ।**
**येणाऱ्या भवितव्याची**
**न आली कल्पना मुळी ॥३॥**

**कार्यक्षेत्रान्तरी त्यांच्या**
**माघारी घटना घडे ।**
**एका गावावरी रात्री**
**दरोडा येउनी पडे ॥४॥**

**धन्याला मारिले ठार**
**लुटली सर्व संपदा ।**
**केले घायाळ कैकांना**
**शस्त्रांनी मारुनी तदा ॥५॥**

**जमादार नसे जागी**
**हा प्रसंग घडे जरी ।**
**क्रोधाने लाल तो झाला**
**'वार्डन'साहेब अंतरी ॥६॥**

**शोधण्या गणुदासासी**
**शिपाई एक धाडिला ।**
**तयाने, येत तो तेव्हां**
**निपाणी वडगावला ॥७॥**

(शिपायाने दासगणूबद्दल कुलकर्ण्यास विचारले. तो मोठा हुषार होता. त्याने दासगणूंची डायरी, गणवेष वगैरे लादणीत लपवून ठेवले व त्या शिपायाकडून सर्व माहिती त्याने काढून घेतली व त्यास सांगितले की ''गणपतराव येथे आले होते. त्यांच्याकडून माझे पैसे येणे असल्यामुळे मी त्यांचे हे घोडे ठेऊन घेतले. ते कुठे गेले याबद्दल मला काहीच माहीत नाही. ते भेटल्यास तुमचा निरोप त्यांना जरूर सांगतो.'' असे बोलून त्याने त्या शिपायास वाटेस लावले. दासगणू परत आल्यावर सर्व वार्ता त्यांना समजली. आता आपली धडगत नाही असे त्यांना वाटले. बाबांच्या म्हणण्याप्रमाणे नोकरी सोडली असती तर ही वेळ आली नसती असे त्यांना वाटू लागले. ते आपले घोडे घेऊन निघाले. रात्र अंधारी होती. काळोख मी म्हणत होता. आणि त्या अंधारात त्यांचे घोडे रस्ता चुकून भलत्याच दिशेने निघाले.

रात्रभर चालूनही कुठल्याच गावचा पत्ता लागेना. शेवटी रस्त्यात तीर्थजननी गोदावरी नदी लागली. गोदावरीच्या पात्रात घोडे शिरले. आणि दासगणू घोड्यावरून खाली उतरले. गोदावरीच्या जलात उभे राहून शिर्डीकडे तोंड करून त्यांनी तीन वेळ ओंजळीने पाणी सोडून म्हटले)

**(२७) साकी**

**जरि हे संकट टळले बाबा**
**आज्ञा मानिन तुमची ।**
**शपथ वाहतो त्यजिन**
**नौकरी साक्ष यास गोदेची ॥**
**ऐसे तइ वदुनी ।**
**करीं सोडियले पाणी ॥**

(आणि ते तिथून पुढे निघाले. रात्र संपत आली होती. सकाळी अंधारातच ते भामाठाण बादाठाण येथे आले. गावाशेजारी काही माणसे शेकत बसली होती. ते भिल्ल होते. त्यांनीच डाका घातला होता आणि मालाच्या वाटणीसंबंधी परस्पर चर्चा चालली होती. त्या चर्चेवरून सर्व प्रकार श्री दासगणूच्या लक्षात आला. ते अगदी सहजपणे शेकोटीजवळ आले आणि म्हणाले -)

**(२८) पद** (शब्द शिलेच्या वरचे०)

**शिंगरू मम घोडीचे ।**
**गेले कोठे न कळे साचे ॥ध्रु०॥**

**बहुत ठिकाणी आलो बघुनी ।**
**फिरूनी फिरूनी गेलो दमुनी ।**
**आलो येथे रस्ता चुकुनी ।**
**काहीच मजला न सुचे ।**
**साह्य मिळो या कामी**
**तुमचे ॥शिंगरू०॥१॥**

(त्यावेळी त्यांच्यापैकी एकाने तेव्हा दासगणूंना म्हटले -)

(२९) पद (प्रकटला की तेथे०)

येथल्या अमीनालागी
खबर द्या तुम्ही ही ।
तोच तुम्हा असल्याकामी
साह्य करील कांही ॥धु०॥

विनंती तयारी केल्या
मदत तो करील ।
शिंगरूहि या घोडीचे
त्वरित सापडेल ।
त्वरे जा तयारी भेटा
मुळि करा न वेळ ।
या विणा दुजा तो
कांही मार्ग दिसत नाही ।
येथल्या अमीनालागी
खबर द्या तुम्ही ही ॥१॥

(यावर श्री दासगणू त्या माणसाला म्हणाले -)

(३०) आर्या

येशिल का मजसंगे इथली
मज माहिती मुळी नाही ।
दाखव घर अमिनाचे
देइन बा द्रव्य मी तुला कांही ॥

(तो माणूस या गोष्टीस तयार झाला. त्यांना घेऊन तो त्या अमीनाच्या घराजवळ आला. घराजवळ येताच दासगणू त्याला म्हणाले -)

(३१) कामदा

बैस येथ तूं, आत जाउनी ।
बघ आलोच मी त्यास भेटुनी ॥
खूष करिन रे मग तुला पहा ।
तुजमुळेच की येत योग हा ॥

(त्यांनी त्या अमीनाला सर्व प्रकार सांगितला. चोर पकडल्याचे सर्व श्रेय आपणासच मिळेल असेही सांगून त्याच्या साह्याने सर्व दरवडेखोर मुद्देमालासह पकडले गेले. त्या अमीनाचे अधिकृत पत्र व चोरांना घेऊन ते स्वस्थळी परतले. त्यांच्या या कर्तबगारीमुळे साहेब तर खूष झालाच, शिवाय दोन जागा सोडून तिसऱ्या जागेवर बढती देण्याचेही त्याने त्याच्या सेवापुस्तिकेत लिहून दिले. बढतीच्या आशेमुळे नोकरी सोडण्याबद्दल आता त्यांचे मन डळमळू लागले. शिर्डीस आल्यावर सर्व लोकांदेखत बाबा त्यांना म्हणाले -)

(३२) साकी

गोदेच्या पात्रात गणू रे
शपथ घेतली कोणी ।
कुणीतरी संकल्प सोडला
स्वकरी घेउन पाणी ॥
तुज हे माहित का? ।
सांग तरी या लोकां ! ॥

(आणि बाबांचे पाय धरून दासगणू म्हणाले -)

(३३) पद (प्रकटला की तेथे०)

क्षमा करा बाबा, समजा
मजसि दया-पात्र ।
दिले पहा सेवेचे या
आज त्याग-पत्र ॥धु०॥

इथुन पुढे आज्ञा तुमची
मानुनी प्रमाण ।
अर्पुनिया सर्वस्वाते
चरणि या वसेन ।
मुळिच तयापासुन
बाबा दूर मज करा न ।
शिरावरी राहो तुमचे
नित्य कृपा-छत्र ।
क्षमा करा० ॥१॥

(आणि श्री दासगणूंनी नोकरी सोडली. तेव्हापासून बराच काळ ते शिर्डीस राहू लागले. अधुन-मधुन संतांची माहिती मिळविण्यासाठी ते बाहेरगावीही जाऊ लागले. संतचरित्रें लिहिण्याचे कामही सुरू होते. तसेच क्वचित प्रसंगी ते कीर्तनेही करू लागले. त्यासाठी त्यांनी स्वतंत्र आख्याने रचली. एकदा शिर्डीस असतांना कीर्तन करण्यासाठी ते निघाले -)

(३४) पद (कटिबंध)

एकदा कीर्तनाप्रती, जावया
निघति भक्त गणुदास ।
वंदण्यास आले
सहजपणे बाबांस ॥
घोळदार अति साजिरी
स्वच्छ पांढरी अंगि अंगात ।
घातली पुणेरी पगडि
लाल, ऐटीत ॥
चाल- नेसले करवती काठी धोतर ।
घेतले उपरणे स्कंधी सुंदर ।
रेशमी रूंदकाठी जे वितभर ।
भाळास गंध लाविले,
करी घेतले टाळ चिपळ्यास ।
बोलले तेधवा यापरि
बाबा त्यास ॥

(३५) श्लोक (व.ति.)

''जाशी कुठे तरि असा
नटसा नटून?'' ।
''मी कीर्तनार्थ
हरिमंदिरि जात होतो!'' ॥
''कैलास थाट नवरा
मुलगाच जैसा ।
हा कीर्तनात नखरा
वद योग्य का तो?'' ॥

(३६) साकी

काढ काढ हा अंगावरचा
सत्वर सारा साज ।
फक्त उपरणे घेउन अंगी
कीर्तन कर जा आज ॥
इथुनी या पुढती ।
हीच पाळणे रीती ॥

(त्यावेळी बाबा त्यांना म्हणाले होते - ''अरे कीर्तन परमार्थासाठी ना ? कीर्तनात तुम्ही लोकांना त्यागाचे निर्लोभतेचे पाठ देणार ना ? मग हा नखरा कशासाठी ?'' बाबांनी सर्व पोषाख काढून घेतला. फक्त उपरणे तेवढे राहू दिले. तेव्हापासून फक्त उपरणेच घेऊन कीर्तन करण्याची प्रथा त्यांनी सांभाळली.

अनेक प्रसंगातून बाबांनी त्यांना परमार्थाचे पाठ दिले. तीर्थस्नानाचे उद्दिष्ट काय आहे याचा पाठ एकदा असाच त्यांनी त्यास शिकविला. तो प्रसंग असा -)

(३७) पद (कोठे वसती कोणा भजती०)

**येत पुण्यमय पर्व महोदय,**
**गंगास्नाना जन जाती ।**
**स्नाना जावे विचार ऐसा**
**दासगणूही मनि करिती ॥ध्रु०॥**

**श्री बाबांच्या आज्ञेवाचुन ।**
**शिर्डी सोडून जाणे शक्य न ॥**
**विचारिती बाबास तसे,**
**ते परि ते संमति नच देती ॥**
**येत पुण्यमय० ॥१॥**

(त्यावेळी बाबा त्यांना म्हणाले -)

(३८) पद (वद जाउ कुणाला शरण०)

**का तळमळ करशी अशी**
**व्यर्थ मानसी, घेइ हे ध्यानी ।**
**होणार काय रे**
**लाभ कातडी धुवुनी ॥**
**मासाहि करितसे स्नान**
**सर्वदा जाण जली राहोनी ।**
**तो उद्धरला हे कधि**
**न ऐकले कोणी ॥**
**अंतरी असावे नित्य**
**शुद्ध अत्यंत, विमल जशि गंगा ।**
**लाभेल पुण्य नच**
**धुवुनी वरल्या भागा ॥**
**पर्वणीस गोदा हवी नको**
**एरव्ही, केवि ये म्हणता? ।**
**ती जवळ असावी**
**सदैव गोदामाता ॥**
**ती असे आपणा जवळि,**
**काळजी मुळी करू नको आता ।**
**धरूनिया विवेका**
**शांत ठेव निज चित्ता ॥**

(महोदयासारखे पर्व, जवळच तीर्थजननी गोदावरी, परंतु श्री बाबा परवानगी देत नाहीत, हे बघून श्री दासगणू अत्यंत खिन्न झाले. ते काहीच बोलले नाहीत. दोन-तीन दिवसांचा काळ लोटला, पर्वकाळाचा दिवस उगवला. आजतरी बाबा जा म्हणतील, या आशेने ते श्री बाबांकडे गेले. आणि -)

(३९) शिखरिणी

**दिनी त्या पर्वाच्या झडकरि**
**सकाळीच उठुनी ।**
**गणू बाबापाशी गमन**
**करती आस धरूनी ॥**
**यदा श्री साईला नमन**
**करण्या मान झुकली ।**
**द्वयांगुष्टी त्यांच्या**
**विमल जलधारा प्रकटली ॥**

(श्री दासगणूंनी ते जल ओंजळीत घेऊन स्वतःच्या मस्तकी व अंगावर शिंपडून घेतले आणि श्री गोदास्नानापेक्षाही निरुपम असा आनंद मिळविला. त्यापेक्षाही तीर्थस्नानाचे उद्दिष्ट काय असावे हे त्यांच्या मनावर उत्कटपणे ठसले.

पुढे बाबांनी त्यांना मराठवाड्यात पाठवितांना म्हटले -)

(४०) पद (रजनीनाथ हा०)

**संत-चरित्रे लिहिण्यासाठी ।**
**नांदेडी जा गोदाकाठी ॥ध्रु०॥**
**मराठवाडा खनि संतांची ।**
**वाण तुला न पडेल कशाची ।**
**तीच कर्मभू समज स्वतःची ।**
**यश देइल हरि राहुन पाठी ।**
**संतचरित्रे० ॥१॥**

(श्री बाबांच्या आज्ञेप्रमाणे ते मराठवाड्यात नांदेडला आले -)

(४१) साकी

**श्री बाळाजी पंत खेडकर**
**गृहस्थ कुणितरि असती ।**
**वकीलिचा व्यवसाय जयांचा**
**नांदेडी जे वसती ॥**
**विद्या-गुरू होते ।**
**श्री गणुदासाचे ते ॥**

(श्री खेडकरांच्या ओळखीने प्रथम ते नांदेडला आले, आणि त्यांच्याकडेच राहू लागले. नांदेडला सुप्रसिद्ध वकील श्री पुंडलिकराव व श्री धोंडोपंत नांदेडकर हे बंधुद्वय राहात होते. त्यांचा आणि श्री खेडकरांचा समव्यवसाय असल्यामुळे घनिष्ट परिचय होता. श्री खेडकरांमुळे श्री दासगणूंचा आणि नांदेडकर वकिलांचा परिचय झाला. व नंतर ते श्री नांदेडकरांच्याच घरी राहू लागले. त्यांचे आणि नांदेडकर मंडळीचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले होते. नांदेडकरांच्या मनात श्री दासगणूंबद्दल निरतिशय श्रद्धा होती. श्री पुंडलिकराव नांदेडकरांनी तर श्री दासगणूंचा अनुग्रह घेऊन शिष्यत्व पत्करले होते. नांदेडकरांच्या घरी - पुंडलिकवाडीत - अनेक उत्सव महोत्सवांच्या निमित्ताने श्री दासगणूंची कीर्तने होऊ लागली. सर्वत्र लौकिक वाढला. संबंध प्रस्थापित झाले -)

(४२) कटाव

**याच विभागीं दासगणूचा ।**
**बहुत वाढला लौकिकसाचा ॥**
**मराठवाडा विभागात ते ।**
**सर्व ठिकाणी झाले फिरते ॥**
**दासगणूचे रसाळ कीर्तन ।**
**लोकांना आवडे मनातुन ॥**
**गावोगावी लोक तयांना ।**
**बोलावू लागले कीर्तना ॥**
**संतचरित्रे लिहिण्याचे ते ।**
**कार्य तयांचे सुरूच होते ॥**
**मधुनी मधुनी ते शिर्डीला ।**
**जाती बाबांच्या भेटीला ॥**
**देवदेवता तीर्थस्थानी ।**
**तसेच जाती मधुनी मधुनी ॥**

(मुखेड, उमरी-गोरटा, हिंगोली या ठिकाणी त्यांचे अनेक लोक भक्त व चाहते निर्माण झाले. ठिकठिकाणी संतांच्या पुण्यतिथींचे महोत्सव होऊ लागले. अनेक ठिकाणी त्यांना लोक प्रेमादराने बोलावत असत.)

(४३) पद (फटका)

(कुंद रदन अरविंद वदन०)

**जाति एकदा दासगणू**
**ते राजमहेन्द्री क्षेत्राते ।**

वासुदेव आनंद सरस्वति
सहज भेटले त्या तेथे ॥
दत्ताचा अवतारच
दुसरा असा जयांचा अधिकार ।
दासगणू भेटताच झाले स्वामी
आनंदित फार ॥

(श्री दासगणूजवळ सोवळ्या-ओवळ्याचा तिलकासा आग्रह नाही, या गोष्टीस उद्देशून स्वामींच्या शिष्यांपैकी कुणीतरी विषय मुद्दाम काढला त्यावेळी स्वामी हसून म्हणाले -)

(४४) दिंडी

अरे आहे हा भक्त पहा साचा ।
पंढरीच्या त्या भ्रष्ट विठोबाचा ॥
शिवो कोणीही चालते तयासी ।
हाच पाळिल मग केवि सोवळ्यासी ॥

(यावर हसतच श्री दासगणूंनी श्री स्वामींना म्हटले -)

(४५) साकी

तुमच्या देवापरिस देव
मम असे बहु भला जाणा ।
असे सोवळे कमी परि तये
स्वधर्म कधि त्यजिला ना ॥
तुमचा बहु वेळा ।
देव यवण की झाला! ॥

(यावर श्री स्वामी हसले व म्हणाले, आपल्या उपास्य देवतेवर अशीच निष्ठा असली पाहिजे - येथून पुढे कुठे जाणार? श्री दासगणू म्हणाले, प्रथम नांदेडी जाऊ व तिथून पुढे शिर्डीस जाण्याचा विचार आहे. त्यावर श्री स्वामी म्हणाले -)

(४६) दिंडी

बंधु माझे थोरले साइनाथ ।
भेद नाही आमच्या उभयतात ॥
तया नारळ देऊन एवढा गा ।
आणि माझा त्या नमस्कार सांगा ॥

(श्री दासगणूंनी तो नारळ आपल्या पडशीत ठेवला. इतरांना त्या नारळासंबंधी मुळीच कल्पना नव्हती. नांदेडला आल्यावर श्री पुंडलिकराव नांदेडकर व इतर काही मंडळी श्री दासगणूंसमवेत शिर्डीस जाण्यास निघाली.

मनमाडला आल्यावर काही कामानिमित्त श्री दासगणू बाहेर गेले होते. स्टेशनवर फराळ करताना चिवडा फारच तिखट लागला त्यावेळी श्री पुंडलिकराव नांदेडकर म्हणाले -)

(४७) साकी

महाराजांच्या पडशीमधला
नारळ काढून फोडा ।
त्याच्यासंगे तिखट न
तितुका जाणवेल की चिवडा ॥
नसले ते जरिही ।
म्हणतिल मुळि नच कांही ॥

(४८) ओवी

ऐसे बोलोनिया त्यांनी ।
नारळ भक्षिला फोडुनी ।
थोडे खोबरे तयालुनी ।
दासगणूसहि ठेवले ॥

(४९) आर्या

दासगणूला नव्हती याची
मुळि कल्पनाच ती कांही ।
बाहेरून आल्यावर
भक्षियले खोबरे तयांनीही ॥

(मनमाडहून सर्व मंडळी शिर्डीत आली. श्री दासगणूंनी आपल्या निवासस्थानी - विठ्ठलमंदिरात आपले सामान ठेवले व सर्व मंडळी बाबांच्या दर्शनास निघाली - मशिदीत प्रवेश केल्याबरोबर श्री बाबा जवळच बसलेल्या श्री माधवराव देशपांडे (शामा) यांस म्हणाले -)

(५०) श्लोक (व.ति.)

"श्याम्या लईच गणु
हा बघ चोरटा रे ।
यानेच खाउ मम
खाउन टाकला रे" ॥

(श्री दासगणू म्हणाले, बाबा, कसला खाऊ.... कोण चोर.... यावर बाबा बोलले -)

"वा रे मलाच वरती
पुसतोस काय ।
साहूच चोर ठरला
विपरीत न्याय"! ॥

(यावर बाबांनी खुलासा केला -)

(५१) आर्या

मम बंधूने दिधला नारळ
तू भक्षिलास की नाही ।
चोरी लपवायाची दिसते
तव खूप छान युक्ती ही ॥

(श्री दासगणूंनी तात्काळ आपल्या मुक्कामी जाऊन आपल्या पडशीत तो नारळ पाहिला. पण सापडला नाही. शोधान्ती त्यांना कळाले की मनमाड स्टेशनवर सर्वांनी खाल्लेला नारण तोच होता, जो श्री बाबांना देण्यासाठी श्री वासुदेवानंद सरस्वतींनी त्यांना दिलेला होता. या घटनेवरून बाबांच्या विलक्षण अन्तर्ज्ञानाचा त्यांना प्रत्यय आला व संतांच्या एकरूपतेविषयीची त्यांची भावना अत्यंत दृढ झाली.

त्यांनी तत्काळ मशिदीत येऊन श्री बाबांच्या चरणी साष्टांग दंडवत घालून म्हटले -)

(५२) पद (हरिश्चंद्र किसन मथुरा को चले)

"सद्गुरूनाथा साई समर्था
क्षमा करा या दासासी ।
अपराधी मी जरीहि असलो
राहू द्या परि पायासी ॥ध्रु०॥

समजा तुमच्या मशिदीतला ।
झाडू केवळ बाबा मजला" ।
ऐसे वदुनी पदि टेवियला ।
माथा वंदन करण्यासी ।
सद्गुरूनाथा० ॥१॥

बाबा तुमच्या दासगणूचा ।
सरस्वती कवि पदरज साचा ।
हेच मागणे विसर तयाचा ।
न पडो तुमच्या चित्तासी ।
सद्गुरूनाथा० ॥२॥

# मी व माझे साई लेखन

- ले. कर्नल मु. ब. निंबाळकर (निवृत्त)
बंड गार्डन रोड, पुणे.

**मा**झ्या लेखांच्या वाचकांकडून नेहमी आश्चर्य व्यक्त केले जाते की माझ्यासारख्या सैनिकाकडून हे लेखन आणि तेही आध्यात्मिक सारख्या गहन विषयावर कसे जमते? परंतु नीट विचार केला तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही.

प्रथम म्हणजे सैनिकांबद्दल आपल्या जनमानसात पुष्कळसा गैरसमज आहे. लोकांची सर्वसाधारण कल्पना असते की सैनिक म्हणजे आडदांड बिनडोक्याचा माणूस. त्याने फक्त कवायत करावी आणि बंदुकीने गोळी चालवावी. वृत्तीनेदेखील तो अतिशय क्रोधी आणि क्रूर असतो. दया-माया, प्रेम, ईश्वरभक्ती या गोष्टी त्याला ठाऊकच नसतात. किती चुकीच्या कल्पना?

आजकाल युद्धशास्त्रातसुद्धा इतर गोष्टींप्रमाणे फारच प्रगती झालेली आहे. या शतकाच्या दोन्ही महायुद्धांत रणगाडे, विमाने, क्षेपणास्त्रे, अण्वस्त्रे यांचा समावेश झाल्याने सैनिकाला तांत्रिक शिक्षण बऱ्याच प्रमाणात घ्यावे लागते. त्यामुळे आता पायदळातही कीं ज्यांच्या बाबतीत तांत्रिक कार्य फारच कमी असते तेथेही साध्या शिपायासाठीही दहावी इयत्ता पासची पात्रता आवश्यक असते. मग अधिकाऱ्याच्याबाबतीत ज्याला शस्त्रे हाताळण्याच्या कलेशिवाय युद्धाचे डावपेंचांचाही अतिशय प्रगत अभ्यास करावा लागतो, तेव्हा त्यासाठी त्याच्या शारीरिक क्षमतेबरोबरच कितीतरी पटीने बौद्धिक क्षमताही अति विशेष लायकीची असायला नको का?

आणखी एक गोष्ट लोक विसरतात की सैनिकालाही कुटुंब असते. त्यालाही आईबाप, पत्नीमुले, इतर नातेवाईक आणि मित्रमंडळी असतात. म्हणजे इतर लोकांप्रमाणे त्यालाही प्रेम जिव्हाळा ठाऊक असतो. मात्र त्याचे एक मोठे आणि वेगळेच वैशिष्टच असते आणि त्याचे कोणालाही बहुधा कौतुक नसते. इतर लोकांप्रमाणे तोही पोटासाठी नोकरी करतो. मात्र इतर लोकांप्रमाणे मुलांबाळात सर्व सुखसोयींसह सतत शहरात ऐषआरामात न राहता मुलाबाळांपासून दूर एकट्याला जंगलात, पहाडांवर किंवा रणांत अतिशय उन्हात किंवा थंडीत बरेचसे दिवस त्याला कंठावे लागतात. त्याशिवाय मरणाचा सतत धोका त्याचेबाबतीत कितीतरी मोठा असतो. असो.

माझ्याबाबतीत आणखी एका गोष्टीची वाचकांना कल्पना नाही. माझे शिक्षण इंग्रजी व मराठी साहित्य घेऊन बी.ए.पर्यंत झालेले आहे. इंटरपर्यंत संस्कृत विषय होता. अर्थातच साहित्य हा माझा आवडीचा विषय. शाळा-कॉलेजच्या काळात कथा-कादंबऱ्यांसारखे मराठी व इंग्रजीतील आणि सैन्यात असताना युद्धवर्णनांचे आणि शास्त्रांचेही बरेचसे इंग्रजीतून वाचन झालेले आहे. लेखनाबद्दल म्हटले तर नेहमी पत्नी व मुलांपासून वर्षानुवर्षे विभक्त राहण्याचे प्रसंग आल्याने मराठी आणि इंग्रजी पत्रव्यवहार सतत चालू असायचा, अर्थात् त्यात काश्मीरसारख्या प्रदेशाची आणि माझ्या दैनंदिन कार्याची वर्णनेही असावयाची. याशिवाय सैन्यातील अधिकाऱ्याला शत्रूशी कोणत्याप्रकारे आणि कोठे युद्ध करावे याबद्दल उलटसुलट बाजू मांडून सविस्तर निबंधही वारंवार लिहावे लागतात आणि त्याशिवाय इतर कार्यालयांप्रमाणे सरकारी पत्रव्यवहारांचे सतत लेखन वेगळेच. अशाप्रकारे माझ्या २९ वर्षांच्या सैनिकी कारकिर्दीतही वाचन व लेखन सतत चालूच होते.

२९ ऑक्टोबर, १९६८ रोजी ५० व्या वर्षी सैन्यातून मी निवृत्त झालो. इतर मुलकी नोकरीप्रमाणे आम्हा सैनिकांना पूर्ण ५८ वर्षांची निवृत्तीची मर्यादा नसते. त्यामुळे निवृत्तीनंतर दुसरी काहीतरी नोकरी किंवा व्यवसाय करण्याची गरज असते. म्हणून मी हॉटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण घेऊन त्याची तयारीही केली होती. पण येथेच साईबाबांनी चमत्कार घडविला.

निवृत्तीच्या एक वर्ष आधी वैद्यकीय तपासणीत हृदयरोगाचे (आयसेमिक हार्ट डिसीज्) निदान होऊन मुंबईच्या नौदलाच्या इस्पितळात दाखल व्हावे लागले. तेथे माझ्या खोलीतच असलेल्या रोग्याने आमच्या दोघांच्या मधील मेजावर श्री साईबाबांचे चित्र ठेवले होते. आम्ही मूळ गुजरातेत बडोद्याला स्थायिक असल्याने आम्हाला श्री साईबाबांबद्दल काहीच माहिती नव्हती. १०-१५ वर्षांपूवी माझ्या सासुबाईंनी शिरडीला जाऊन आल्यावर बाबांचे एक चित्र आम्हाला दिले होते ते आम्ही देव्हाऱ्यात ठेवले होते एवढेच. माझ्या शेजारचा रोगी माझ्या ओळखीचा निघाला. गुरखा पलटणमध्ये माझ्याबरोबरच मेजरच्या हुद्द्यावर होता. त्रावणकोरचा (कर्नाटकातील) होता. लग्न केले नव्हते. दारू पिण्याचे व सिगरेट ओढण्याचे दाट व्यसन होते. असा माणूस एखाद्या संताची भक्ती करीत असलेला पाहून मला आश्चर्य वाटले. त्यातून नंतर याबद्दल गोष्टी करताना इस्पितळातून रजा मिळाल्यावर प्रथम शिरडीला जाऊन येण्याचा बेतही त्याने मला सांगितला.

अर्थात् हे सर्व ऐकून श्री साईबाबांबद्दल मला कुतूहल जागृत झाले. संध्याकाळी माझे जावई मला भेटण्यास आले. ते साईभक्त असल्याचे मला ठाऊक असल्याने श्री साईबाबांबद्दल काही साहित्य त्यांच्याकडे आहे का याची चौकशी केली. त्यांनी त्यांच्याजवळ ते गुजराती भाषेत असल्याचे म्हटले. मी बडोद्याचा असल्याने मला गुजराती भाषेचा प्रश्नच नव्हता. जावयांनी श्री साईसच्चरित आणून दिल्यावर ते मी लगेच वाचून काढलेही. त्याच्या

प्रस्तावनेत ते सात दिवसात वाचले तर काहीतरी चमत्कार घडतो असे लिहिलेले वाचून मला ते पुन्हा सात दिवसात वाचण्याची इच्छा झाली. दोन दिवसांनी इस्पितळातून माझी सुटका झाली आणि पहिल्या गुरूवारीच ते मी वाचण्यास सुरू केले. पुढल्या गुरूवारी सकाळी लोकसत्ता (७ ऑगस्ट, ६७) वाचायला घेतले तर साईबाबांच्या पादुकांचे चित्र आणि श्री साईबाबांच्या चांदीच्या पादुका शिरडीहून लंडनला नेण्यात येत असल्याची आणि त्या फणसवाडीतील श्री विठ्ठल मंदिरात दर्शनाला ठेवण्यात आल्याची माहिती पाहण्यात आली आणि खूप आनंद झाला. श्री साईसचरित वाचून शिरडीला बाबांच्या समाधीच्या दर्शनाला जाण्याची इच्छा झालीच होती तर आता हा मजकूर वाचून मला वाटले की बाबा जणूकाय मला म्हणत आहेत की शिरडीला तू येशील तेव्हा तू येच पण आज मी येथे आलेलो आहे तर मला भेटून घे की? अर्थात संध्याकाळी दर्शनाला जाण्याचा बेत मी निश्चित केला.

संध्याकाळी मी व सौभाग्यवती आमच्या सासुबाईंसह विठ्ठल मंदिराकडे निघालो. मंदिराचे निश्चित ठिकाण आम्हाला किंवा टॅक्सी ड्रायव्हरला माहीत नव्हते. पण टॅक्सी फणसवाडीत थांबली ती नेमकी विठ्ठलमंदिरासमोरच. पुढे मंदिरात पादुकांचे दर्शन घेतल्यावर तर आनंदाला सीमाच नव्हती. मी साईबाबांच्या चरणांना स्पर्श केला आणि अंगातून एक गोड शिरशिरी निघून गेली. हात व मस्तक चरणांपासून दूरच करवेना. गर्दीमुळे फार थांबणे शक्य नव्हते. प्रदक्षिणा घालून पुन्हा तेथे आलो व कितीही दर्शन घेतले तरी मनाचे समाधान होईना. तेव्हापासून मनाने ठरविले की हे चरण कधीच सोडावयाचे नाही :

**"लाधलो साईंचा चरणस्पर्श ।**
**पावलो जो परामर्ष ।**
**तोचि या जीवाचा परमोत्कर्ष ।**
**नूतन आयुष्य तेथूनि ॥१४०॥**

- अध्याय २

त्यानंतर अर्थातच कै. गो. र. दाभोलकरांची श्री साईसचरिताची ओवीबद्ध पोथी मी विकत घेतली आणि वाचून काढली. वाचल्यावर रोज नियमितपणे एक अध्याय वाचण्याचा संकल्प केला आणि तो आजपर्यंत २७ वर्षे न चुकता चालू आहे. त्याशिवाय श्री साईबाबांवर जेवढी मिळतील तेवढी पुस्तके वाचून काढली आणि मग ज्ञानेश्वरी, एकनाथी-भागवत, तुकाराम गाथा आणि दासबोध वाचून झाले. कॉलेजमध्ये संस्कृत हा माझा आवडता विषय होता. तेव्हा मूळ संस्कृत ग्रंथ वाचण्याची इच्छा झाली. प्रथम रामायण व महाभारत संस्कृतमध्ये वाचले आणि नंतर उपनिषदे आणि वेद यांचाही अभ्यास झाला. पातंजल योग वाचल्याने योगासने व ध्यान यांचाही नाद लागला.

याच काळात पुन्हा नोकरी किंवा व्यवसाय करण्याचा प्रयत्न सुरू होता. पण कोणास ठाऊक कोठेच जमेना. हृदयविकाराचे निदान होऊन थोडासा त्रासही सुरु झाला होता. पण ५०-५२ व्या वर्षी बसून खाणे मनाला पटत नव्हते. मध्यंतरी हॉटेल व्यवसायात चांगली नोकरी मिळालीदेखील. पण ६ महिन्यात स्वतःच सोडली. अध्यात्माकडे आणि साईसेवेकडे ओढ लागली होती. नंतर एकदा मनात विचार आला की ५०व्या वर्षी मुलीचे लग्न आणि तीन मुलांची उच्च पदावरच्या नोकरीवर नियुक्ती कोणाच्या बाबतीत शक्य आहे? फक्त चवथ्या मुलाचे कॉलेजचे शिक्षण बाकी होते आणि त्याची जबाबदारी दुसरी तीन कमवती मुले घेण्यास तयार होती. शिवाय मलाही जरूर पडल्यास वारंवार आर्थिक साहाय्य करण्यास एका पायावर तयार होती. असे भाग्य कोणाला लाभणे शक्य होते? ईश्वरकृपेने या जन्मी मला लाभले होते तर साईभक्ती करून व मोक्षप्राप्तीची साधना करून त्याचे सार्थक मी का करू नये असा मनात विचार आला आणि लगेच निश्चय केला की यापुढे आयुष्यभर साईभक्ती आणि साईसेवा हेच ध्येय!

इ.स. १९७२ साली त्यावेळचे कार्यकारी संपादक कै. द. दि. परचुरे यांच्या आग्रहाने दिवाळी अंकात माझे काही अनुभव लिहून दिले. त्यातील माझी मराठी भाषाही त्यांना आवडली. पण आपले अनुभव दुसऱ्यांना सांगणे बरे नव्हे. अहंकार वाढतो म्हणून लेखन बंद केले. पण आणखी ८ वर्षांनी म्हणजे इ.स. १९८० साली त्यावेळचे कोर्ट रिसिव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब आणि कार्यकारी संपादक श्री. सदानंद चेंदवणकर यांच्या आग्रहाने आणि उत्तेजनाने पुन्हा लेखन सुरू केले. हळूहळू माझे लेख आवडल्याबद्दल वाचकांची पत्रे येऊ लागली. शिरडीत भरणाऱ्या लेखक-कवी संमेलनातही अनेक भक्तांनी माझे लेख आवडल्याचे मत प्रदर्शित केले. अर्थातच मग माझा उत्साह वाढून सतत लेखन सुरू केले ते आजही चालू आहे. योगायोग म्हणजे माझा आजचा हा मराठी लेख श्री साईलीलेतील १०० वा लेख आहे. त्याशिवाय साईप्रसाद, साईसागर, भालचंद्र वगैरे नियतकालिकातून आणखी मराठी सुमारे ५० लेख, आणि श्री साईलीला (इंग्रजी) व इतर इंग्रजी नियतकालिकातून इंग्रजी ५० लेख असे एकंदर २०० च्यावर माझे लेख प्रसिद्ध झालेले आहेत.

इ.स. १९८६ च्या सुमारास मनात विचार आला की कै. गो. र. दाभोलकरांचे श्री साईसचरित ओवीबद्ध असल्याने आणि त्याची भाषा प्राचीन मराठी आणि अवघड संस्कृत शब्दांनी युक्त असल्याने आजच्या पिढीला समजण्यास जड जाते तर आपण त्याचे सोप्या भाषेत गद्यात सविस्तर टिकेसह भाष्य का लिहू नये? म्हणून त्यातील अत्यंत अवघड अशा चार अध्यायांचा (१६, १७, ३९, व ५०) शब्दशः भावार्थ जाने. ८७ ते ऑगस्ट ८७ च्या अंकात प्रसिद्ध करविला. त्याला वाचकांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. अनेक भक्तांची अभिनंदनपर पत्रे आली आणि श्री साईलीलेत मी अध्याय १ ते ५३ सर्व अध्यायांचा गद्य भावार्थ प्रसिद्ध करण्याबद्दल विनंत्याही आल्या.

त्यावरून १९८७ च्या दसऱ्याच्या मुहूर्तावर श्री साईसचरिताच्या १ ते ५३ अध्यायांचा सटीक गद्य अनुवाद मी लिहिण्यास घेतला आणि श्री साईकृपेने इ.स. १९९० च्या दसऱ्याला सुमारे १३०० हस्तलिखित पानांचा हा ग्रंथ पूर्ण केला. खरे

# श्री साईनाथ महाराजांचे वैशिष्ट्य

- श्री. सुहास हरी जोशी
शिरूर-घोडनदी, पुणे.

**श्री** साईनाथमहाराज भक्तांना सतत वाचवीत असतात, मार्गदर्शन करतात, कृपा करतात, हे अगदी खरे आहे. श्री साईनाथ महाराजांचे हे महान वैशिष्ट्य आहे. भक्तरक्षका, प्रतिपालका हे साईनाथा, तू आमची माता, तू आमचा पिता, तू आमचा आचार्य. तू म्हणजे सर्वकाही ! याचा सतत प्रत्यय येतोच.

एकदा प्राचार्य श्रीमान शिवाजीराव भोसले यांना घेऊन मी निफाडहून शिरूरला चाललो होतो. आणि वाटेत शिवाजीराव काहीसे आठवून मला म्हणाले, ''हो, सुहासराव, आपल्याला वाटेत कुठेतरी भोजन करावयाचे आहे !''

आणि माझ्या डोळ्यांपुढे काजवेच चमकले. खरंच माझ्या खिशात अगदी मोजके पैसे होते. आता चालक, शिवाजीराव आणि मी या तिघांची जेवणं कशी काय होणार ? काही सुचेना.... चेहरा पडला.... आता काय होणार ? शेवटी मन शांत केले, शेवटी त्या दयाघन प्रभूला काळजी आहेच. म्हटलंच आहे ना 'तुका म्हणे टाकू तयावरी भार।' जरा वेळाने अचानक शिवाजीराव पुनश्च म्हणाले, ''हो सुहासराव, आपल्याला शिरडीला श्रींच्या दर्शनासाठी थांबायचं आहे बरं का !''

आणि एकदम, एकदम पण हायसं वाटलं, एकदम मन निवान्त झालं. सुदैवाने, श्रीकृपेने शिरडीत ओळखी होत्या. बाबूजी आहेत, टिनूभाई आहेत. कुणीही व्यवस्था करील, अगदी आनंदाने.... म्हणजे सुटलाच की प्रश्न ! मनातल्या मनात मी टाळी वाजवली. श्रींचे दर्शन झाले आणि नंतर अगदी श्रीखंडाचे जेवण झाले. पुन्हा मला व्यय काहीच नाही. उलट त्यांना, शिवाजीरावांसारखा मनुष्य आपल्याकडे जेवावयास आला, याचा प्रचंड आनंद होता. मी सुटलो होतो. साईनाथ महाराज, आपली कृपा महती आहे.

श्री साईनाथ महाराज, आपली कृपा महान आहे त्यामुळेच मला एकदा एका अतिशय स्फूर्तिदायक, सुन्दर गोष्टीचा लाभ झाला. डहाणू-कोसबाडहून मी 'नरपड' या गावी आलो. नरपड येथे श्री साईबाबांचे सुंदर मंदिर आहे, असे कळले होते. आनंद वाटला. मंदिराच्या दिशेने मार्गस्थ झालो.... मनात भाव दाटून आले. एवढ्यात एक छोटी विहीर दिसली. अरे वा ! हातपाय स्वच्छ धुवून, पवित्र होऊन मगच दर्शनाला जाणे चांगले.... ही आपली परंपरा. पण बादली दिसेना की दोर ! आता काय करायचं ! पण योग असा की एक मुलगी, वय केवळ १०-१२ वर्षांचे, कुठूनशी आली आणि त्या हुशार कन्यकेने मला विचारले, ''बाबा, तुम्हाला पाणी हवंय का ?'' मनात म्हटलं कमाल आहे. शाब्बास. मी तिला म्हटलं, ''हुशार आहेस. पाणी दिलंस तर बरं होईल.'' तिने लगेच कासरा-बादली आणली आणि मला पाणी काढून दिलं. हात-पाय धुतल्यावर किती बरं वाटलं म्हणून सांगू ! मग तिला मी बक्षीस म्हणून रूपया-दोन रुपये देऊ लागलो.... तर ती घेईना. पुन्हा आग्रह केला, पण घेईना. पुन्हा म्हटलं, त्या दुकानात गोळ्या आहेत, घे ना विकत.... तरीही तिच्या मनाला मोह पडला नाही... अगं, तुझे आई-वडील रागावणार नाहीत.... तरीही तिचे 'नको' हे पालुपद कायमच होते. फार आग्रह केला तर ती एकदम उद्गारली,

''अहो बाबा, पाणी देणे हा धर्म असतो आणि धर्माचे पैसे घ्यायचे नसतात !''

डोक्यात वीज चमकावी, तसं झाले. हजारो कोटी रुपये खाणारे प्रचंड सुशिक्षित कुणीकडे व घरी गरीबी असूनही एवढे उदात्त उद्गार काढणारी, नि:स्वार्थ अशी ही कन्या कुठे ! खरेच 'आजि म्या नवल देखिले।' श्री साईबाबा, तुमचे संस्कार महान आहेत. मी मुलीला विचारलं, तुझं नाव तरी काय ? मंगला भरत मर्दे असं काहीसं नाव तिनं सांगितलं.... श्री साईबाबांच्या कृपेने आई-वडिलांनी केवढे महान संस्कार केलेले आहेत.... महाराज, सगळ्या समाजावर असे संस्कार करा हो !

एकदा नगरचे श्री. साहेबराव निसळ भेटले. ते म्हणाले, मी एकदा श्री साईनाथांच्या दर्शनाला गेलो होतो.... श्री दासगणू महाराजांचा आणि आमचा नित्यसंबंध असे. त्यांच्याकडून श्री साईबाबांविषयीच्या कितीतरी कथा कळत. तर एकदा शिरडी येथे गेलो. श्री महाराजांच्यापाशी दोन लालबुंद पारशी अश्रू ढाळत बसले आहेत, असे दृश्य दिसले. दर्शन घेत घेत जरा वेळाने भोजनालयात पोचलो तर नेमके माझ्याच शेजारी ते दोघे पारशी बसलेले होते. मी सहज आपुलकीने चौकशी केली.... तर ते म्हणाले, आम्ही विमानवाहक म्हणजे पायलट आहोत. आमच्या कार्यालयातले सगळेजण साईभक्त आहेत. तेथे श्री साईनाथांच्या चर्चा चालायच्या.... आम्ही ते विशेष गांभीर्याने घेत नसू, उलट थट्टेवारीही नेत असू. आणि काल विमानाचा प्रवास चालू असताना अकस्मात तोल सुटला, ताबा गेला, पुढचं अतिभीषण दृश्य डोळ्यांसमोर तरळू लागलं.... काही सुचेना.... २-३ मिनिटांचा खेळ.... आणि आम्ही एकदम ओरडलो, 'महाराज !'.... आणि कार्य आश्चर्य, पुन्हा तोल सावरला गेला, ताबा मिळाला, विमान सुरळीत झालं आणि खाली उतरले मात्र, लगेच तेथून निघालो तो थेट शिरडी....

खरंच, महाराज आपली कृपा अगाध आहे.

आपले कठोर परिश्रम, दीर्घ प्रयत्न अधिक महाराजांची कृपा.... मग सर्वकाही होऊ शकेल. दृढ श्रद्धेची नितान्त आवश्यकता 'समर्था तुझीये कृपेवीण काही। स्वत: अल्पही कार्य होणार नाही ॥'

भागोजी शिंदे नामक एक गृहस्थ महाराजांची मनापासून सेवा करीत असत. ते महाराजांचे मर्दन (मालिश) करीत.

वास्तविक या भागोजींना महाव्याधीने पछाडले होते, तरीही महाराजांनी कधीही त्यांचा कंटाळा केला नाही, किंवा त्यांच्या संबंधीचा आपला नित्यक्रम यत्किंचितही बदलला नाही. मात्र आम्ही मंडळी आज कुष्ठरोग्यांचा किती तिटकारा करतो पण महाराज असे होते की 'जे का रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा ॥'

महाराजांच्या पुढे मोठमोठी माणसंही आपला मोठेपणा विसरीत. माती-दगड वाहणे, रस्ते झाडणे, खड्डे खोदणे, झाडे लावणे, लाकडे फोडणे, हंडया-झुंबरे पुसणे आदी कामे मोठमोठी मंडळी आणि मोठ्या घरातल्या कुलस्त्रियाही करीत आणि आपल्याला सेवा करण्याला संधी मिळाली म्हणून आनंद मानीत. अहंकार विसरावयास लावणे ही किती कठीण गोष्ट आहे. पण महाराजांनी सर्वांना समान पातळीवर आणले.

महाराजांचा उपदेश हा मुख्यत: नैतिक आहे. शिष्याची भूमिका शुद्ध करून मग त्यात ज्ञानाचे बीज पेरावयाचे ही त्यांची पद्धत. पण उघड शाब्दिक बोधापेक्षा असंख्य पटींनी मौल्यवान असा अनुभवरूपाने बोध महाराजांपासून मिळत असे आणि त्यामुळेच महाराजांकडे श्रद्धेने येणाऱ्या भक्तांचे अति उच्च प्रतीचे हित होत असे.

महाराजांकडे येणाऱ्यांमध्ये सकाम भक्तांचेच प्रमाण फार मोठे असे, पण महाराज त्यांची कामना पुरवून त्यांचे मन आत्यंतिक हिताकडे बेमालूमपणे वळवीत. महाराजांचा अवतार लोकांच्या उद्धारासाठीच होता, आणि त्यांनी सगळ्यांचे हितच केले यात तिळमात्र शंका नाही. त्यांच्या लीलांचे आणि गुणांचे यथार्थ वर्णन होणे अशक्य आहे. (हरी सीताराम दीक्षित)

प्रभू श्रीरामचंद्र हे भारतीय एकात्मतेचे प्रतीक होते म्हणून बाबांनी शिरडी येथे श्रीरामनवमी उत्सव प्रवर्तित केला. खरोखर बाबांच्या समन्वयदृष्टीला, एकात्मदृष्टीला तोड नाही.

महाराजांनी चमत्कार केले पण त्यांचा उद्देश लोक ईश्वरभक्तीकडे वळावेत हाच होता. (प्रा. डॉ. प्र. न. जोशी)

सर्वांभूती समानता हा महाराजांचा फार मोठा विशेष होय. महाराज, आज हिंदुस्थानला या गुणाची फार आवश्यकता आहे. कुत्री, गाढवे, बेवारशी जनावरे, अनाथ-अपंग, आजारी-रोगी या सर्वांवर ते फार प्रेम करीत. (पं. महादेवशास्त्री जोशी) खरंच मात्र या अपार सहानुभूतीची, समानदृष्टीची फार आवश्यकता आहे. श्री साईनाथमहाराजांनी कधी कनवाळूपणे, कधी धाकदपटशा दाखवून, कधी नीट समजूत घालून, तर प्रसंगी नुसत्या हस्तस्पर्शाने अनेकांना सावरले. सर्वांभूती समभाव नि नीतियुक्त वर्तन अशी त्यांची शिकवण असे.

---

(पृष्ठ क्र. ४३ वरून)

म्हणजे या काळात माझ्या वयाची ७० वर्षे उलटलेली होती आणि मोतिबिंदू व काचबिंदूच्या व्यथेने दृष्टी अति मंद झालेली होती. तरी एवढे मोठे लेखन माझ्या हातून पूर्ण झाले, यासाठी गुरूकृपेशिवाय आणखी दुसरे कारण कोठून असणार?

**''हे अपार कैसेनि कवळावें ।**
**महातेज कवणें धवळावें ।**
**गगन मुठीं सुवावें ।**
**मशकें केवीं ॥७४॥**
**परी एथ असे एक आधारू ।**
**तेणेचि बोले मी सधरू ।**
**जै आनुकूल श्रीगुरू ।**
**ज्ञानदेव म्हणे ॥७५॥**

- ज्ञानेश्वरी अ. १

पुढे ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचा प्रश्न होताच. पण तोही माझ्या धाकट्या भावाचे साह्याने बाबांनी सोडविला आणि इ.स. १९९३ च्या दसऱ्याच्या सुमारास ज्ञानेश्वरी किंवा दासबोध ग्रंथाच्या आकाराचा (७'' x ९ १/२'') सुमारे ७०० पानांचा सुंदर सचित्र ग्रंथ प्रसिद्धही झाला. आणखी आनंदाची गोष्ट म्हणजे कोठल्याही ग्रंथविक्रेत्याकडे ग्रंथ न ठेवता व कोठल्याही वर्तमानपत्रात जाहिरात न देता छापलेल्या १००० प्रती १-१॥ वर्षांत संपतही आल्या आहेत. असो.

गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्यात माझी हृदयाची शस्त्रक्रिया झाली आणि बाबांच्या कृपेने उत्तम तऱ्हेने पार पडली. त्यामुळे लेखनाला आणखी उत्साह आला आहे. पाँडिचेरीच्या अरविंदो सोसायटीकडून 'श्री अरबिंदो ॲण्ड मदर' यांच्या प्रत्येक विषयांवरचे विचार आणि शिकवण लहान लहान पुस्तिकांच्या रूपाने प्रसिद्ध केलेले आहेत. त्या धर्तीवर 'श्री साईबाबांचे तत्त्वज्ञान आणि शिकवण' म्हणून माझे २० लेख मराठीतून श्री साईलीला (मराठी)तून प्रसिद्ध झालेले आहेत आणि इंग्रजीतून श्री साईलीला (इंग्रजी)तून प्रसिद्ध होत आहेत. हेही पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

वर माझ्या साईभक्तीची आणि साईलेखनाची वाटचाल वर्णन केली आहे. खरे म्हणजे माझ्या स्वत:बद्दल मी पूर्वी कधीही लिहिले नाही. त्यामुळे अहंकार जागृत होण्याची शक्यता असते. पण कार्यकारी संपादकांनीच हा विषय दिल्याने मला लिहिणे भाग पडले. तेव्हा प्रिय वाचक हे गोड मानून घेतील अशी आशा करतो.

एकूण परमकृपाळू श्री साईबाबांनी 'चिडीच्या पायाला दोर बांधून ओढून आणतात' तसे मला त्यांच्याकडे ओढून घेऊन माझे साईभक्तात रूपांतर केले, साईभक्तीत रमविले आणि बरेच लेखन करवून साईभक्तांची सेवा करवून घेतली यापेक्षा आणखी श्रेष्ठ भाग्य ते कोणते? प्रपंचातही भरपूर मानपान व सुबत्ता दिली, पुत्रपौत्र दिले, सुखसमाधान दिले. आता एकच इच्छा. बाबांनी माझ्याकडून अशीच सेवा करवून घेत घेत त्यांचे चरणी विलीन करून घ्यावे एवढेच.

**दृष्टीपुढें संतचरण ।**
**असतां जया प्राणिया मरण ।**
**धन्य देह तो कृष्णार्पण ।**
**पुनर्जनन नाहीं त्या ॥१४८॥**

- अध्याय ३१

# संत नामदेव महाराजांचे पसायदान

– स. कृ. देवधर

**संतश्रेष्ठ ज्ञानदेवांचे पसायदान सर्वदूर परिचित झालेले. भारताच्या सीमा ओलांडून ते विदेशातही पोचले आहे. ज्ञानदेवांप्रमाणेच प्रत्येक संतांचे पसायदान आहे. या लेखात वेदमूर्ती स. कृ. देवधर यांनी संतशिरोमणी नामदेव महाराज यांच्या पसायदानावर निरूपण केलेले आहे. या पसायदानातून आपणास दिव्यतेचे, उदात्त विचाराचे दर्शन होते.**

संतांची मांदियाळी हें महाराष्ट्राचे महान वैभव आहे. केवळ भारतातच नव्हे तर जगाच्या पाठीवर महाराष्ट्राइतके संत कोठेच झाले नाहीत. म्हणून महाराष्ट्राला संतांची भूमी असें गौरवाने म्हटलें जाते. त्यांतही बाराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि तेराव्या शतकाचा पूर्वार्ध या काळामध्यें महाराष्ट्राला भक्तिवैभवानें अजरामर केलें. या काळांत महाराष्ट्रांत खऱ्या अर्थानें भक्तिसागराला उधाण आले होतें. प्रापंचिक सागराला भगवंताने मर्यादा घालून दिल्या आहेत पण या सागराला मर्यादा घालणं त्याला रूचणारं नव्हतं. 'समुद्री रेखा नोलांडवी' ही भगवंताची करणी या ठिकाणीं खोटी ठरली. यामुळेंच महाराष्ट्रातल्या भक्तिसागराच्या लाटांनी पंजाबच्या सीमांनाही स्पर्श केला. त्या प्रान्तात देखील देवत्वाची उगवण केली. या कोवळ्या अंकुरांना कबीर-कमालसारख्या देवप्रियांनी कुरवाळ्लं आणि मोठं केलं. या भक्तिसागराच्या वैभवाला ज्ञानेश्वर महाराज जितके कारणीभूत आहेत तितकेच नामदेवही आहेत. नामदेवांनी पंढरीची भक्तिध्वजा पंजाबांत रोवली तेव्हांपासून तेथील भाविकांचें लक्ष महाराष्ट्राकडे लागले.

ज्ञानदेवांना असीम पारमार्थिक वैभव लाभले होतें. या वैभवाच्या दिव्य तेजाच्या प्रभावळींत अनेक संतांचें कर्तृत्व झांकले गेले. त्यामुळें सामान्यांना त्यांची खरी ओळख होऊ शकली नाहीं. ज्ञानदेवांवर अकांक्ष प्रेम करणारे सर्वच संत महान होते. त्यांच्यामध्यें तरतमाचा अनुभव नव्हता. परंतु ज्ञानदेव समाधिस्थ झाले आणि त्यांच्या प्रभावळीतील एकेका संताचें आगळें पण लोभस व्यक्तिदर्शन सामान्यांना होऊं लागले. विशेषत: नामदेवांना फार मोठे आयुष्य लाभले होतें. ज्ञानदेवांनी समाधी घेतली तेव्हां नामदेव केवळ पंचवीस वर्षांचे होते. त्यामुळें पुढील पन्नास वर्षांच्या काळांत त्यांनीं ज्ञानदेवांचेंच कार्य जोमानें करून त्यांच्या कार्यकक्षा भारतसीमेपर्यंत भिडविल्या. ज्ञानदेवांच्यानंतर देखील नामदेवांनीं उत्तर भारताच्या यात्रा केल्या. त्यामध्यें पंजाब आणि काशी प्रांताचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. पंजाबांत कबिरांनी फुलविलेले भक्तीचे मळे त्यांनीं पाहिले. काशीतील पंडितांचा बाहेरून देवत्वाशीं नातें सांगणारा अहंभाव पाहिला आणि त्याचवेळीं स्वार्थलोलुप राजेशाहीदेखील पाहिली. या सर्वांत आश्रयासाठीं कां होईना, भक्तीचा वसा घेण्याचा सामान्य माणसाचा कलही त्यांच्या नजरेतून सुटला नाहीं. स्वार्थलोलुप आणि धर्मांध राजसत्तेच्या दडपणाखालीं अशा सामान्यांचें निर्दालन कसें होईल हें कोणालाच सांगतां येण्याजोगें नव्हतें. तेथील सामान्यांची दुर्दशा पाहून नामदेवांचे मन हेलावलें. परंतु त्या ठिकाणी त्यांना करतां येण्याजोगें कांहींच नव्हते. या लोकांसाठी कांहीतरी केले पाहिजे असा मनाचा संकल्प करून ते पुन्हा पंढरपूरला आले.

पांडुरंगाजवळ नेहमी हट्ट करून आपलें काम पूर्ण करून घेणें हा त्यांचा स्थायी स्वभाव होता. पांडुरंगाला दूध प्यायला लावलें, ज्ञानदेवांबरोबर तीर्थयात्रेला जावयाचें ज्ञानदेवांनीं समाधी घेतल्यावर मला ज्ञानदेवांचें दर्शन पाहिजे वगैरे अनेक गोष्टींसाठीं नामदेवांनीं देवाजवळ हट्ट केले होते आणि आपले इप्सित पदरांत पाडून घेतलें होतें. या हट्टाची संगत स्वीकारून आपल्या मनांतील भाव देवांना सांगावयाचा असें त्यांनी ठरविलें. त्यांचा विश्वास होता पांडुरंगाला काहींच अशक्य नाहीं. आपण आपलें गाऱ्हाणें तरी त्याच्या कानावर घालूं असे नामदेवांनी ठरविलें.

## सामान्यांच्या भल्याची इच्छा

ज्ञानदेवांनीं समाधी घेतली त्यामुळें सर्व भक्तगण आपापल्यापरी बाजूला झाले. नामदेवांच्या भाषेंत सांगायचे तर - बांधल्या पेंडीचा सुटलासे आळा। तृण रानोमाळा धांवतसे। या भक्तांना मार्गदर्शन करणारे अनुभवी नव्हते. त्यांना त्राता फक्त पांडुरंग आहे याची नामदेवांना खात्री होती म्हणून त्यांच्या किंबहुना देवत्वाचा वसा घेतलेल्या सामान्यांचें सुद्धा भलें व्हावें म्हणून नामदेवांनीं पांडुरंगाला आपलें मनोगत सांगितलें. गाऱ्हाणें घातलें आणि अखेर पसायदान मागितलें.

त्यांच्यापुढें ज्ञानदेवांचें पसायदान होतें. ज्ञानदेवांना किती छळ सोसावा लागला होता. पण त्यांचा उच्चारही न करतां ज्यांनीं छळले त्या लोकांच्या विकृत वृत्तित बदल व्हावा म्हणून ज्ञानदेवांनीं आपल्या गुरुंजवळ मागणी केली. त्यांच्याच

पावलावर पाऊल टाकून पुढें चाललों तर तें चुकीचें होणार नाहीं इतकेंच नव्हे तर त्यांतून सुखाचा मार्ग मिळेल. आपण तर सुखी होऊंच पण आपल्या बरोबर परमेश्वराचे अन्य भक्तसुद्धां सुखी होतील. पांडुरंगाशी असलेली आपली लडिवाळ सलगी फुकट जाणार नाहीं याची नामदेवांना खात्री होती.

एके दिवशीं सकाळच्या शांत वेळीं नामदेव पांडुरंगाच्या मंदिरांत आले. त्याच्या पायावर मस्तक ठेऊन नमस्कार केला आणि अत्यंत आर्द्र स्वरानें ते पांडुरंगाला म्हणाले - पांडुरंगा दीन दुबळ्यांचा उद्धार करणारा तूंच आहेस. तुझ्या भक्तांना तुझी सलगी कायमची लाभावी, त्यांच्या भक्तीमध्यें व्यत्यय येवूं नये म्हणून माझी तुझ्याजवळ एक मागणी आहे.

**आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळां ।**
**माझीया सकळां हरीच्या दासां ।।**
**कल्पनेची बाधा न हो कोणें काळी ।**
**ही सन्तमंडळी सुखी असो ।।**
**अहंकाराचा वारा न लागो राजसां ।**
**माझिया विष्णुदासां भाविकांसीं ।।**
**नामा म्हणे तयां असावें कल्याण ।**
**ज्यां मुखीं निधान पांडुरंग ।।**

(नामदेवगाथा : सरकारी प्रत ८७१)

नामदेवांना ज्ञानदेवांचा फार मोठा सहवास लाभला होता. ज्ञानदेवांच्या अंतरीचा सुखनाद नामदेवांच्या पूर्ण परिचयाचा होता. आपल्या सुखनादाचें दान सामान्यांना करण्याच्या इच्छेनें ज्ञानदेवांनी गीतेचें निमित्त केलें. याच ज्ञानेश्वरीचें परिशिलन नामदेवांनी केले आणि गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी असा आपल्या आदराचा ठसा उमटविला. त्या ज्ञानेश्वरीचा मागोवा घेतांना सर्वांच्या भल्यासाठीं ज्ञानदेवांच्या अंत:करणांत निर्माण झालेला ओलावा त्यांच्या प्रत्ययाला आला होता. ज्ञानदेवांच्या पसायदानानें त्यांचें चित्त वेधून घेतलें आणि त्याच आर्द्र हृदयानें नामदेवांनी आपली आर्तता देवाला कथन केली.

काहींना वाटतें हें मागणें आहे. पण मागणें आणि पसायदान यांमध्ये फार मोठा फरक आहे. मागणें हें स्वत:साठीं असतें. तेंच मागणें स्वत: सोडून अन्यांसाठी असेल तेव्हां त्याच मागण्याला पसायदान असें म्हणतात.

ज्ञानदेवांचे पसायदान त्यांच्या स्वत:करतां नाहीं. परसुखें जाये सुखावतु - असा ज्ञानदेवांचा स्वभाव होता. ज्ञानदेवांनी आपल्या गुरुंजवळ हें पसायदान मागितलें आणि श्रीगुरु निवृत्तिनाथांनीं त्यांना तें आनंदानें आशीर्वादाचा हात उंचाऊन दिले. त्यामुळें ज्ञानदेवांना सुखठेवा मिळाला हें ज्ञानेश्वरीच्या वाचकांना अपरिचित नाहीं. पसायदान म्हणजे मागणें असलें तरी त्या मागण्याच्या मागें मागणाऱ्याची कृतार्थता लपलेली असते. ज्ञानदेव काय किंवा नामदेव काय आपल्या जीवनांत कृतार्थ झाले होते. मनुष्य जोपर्यंत कृतार्थ झाला नाहीं तोपर्यंत मागण्यामध्यें स्वार्थाचा लवलेश असतो परंतु ज्यावेळीं मागणारा कृतार्थ, समाधानी असतो तेव्हां त्याच्या मागण्यामध्यें स्वार्थाचा गंधसुद्धां नसतो. ज्ञानदेव असोत अगर नामदेव असोत आपल्या कृतार्थ जीवनाच्या काळांतच - बुडते हे जन न देखवे डोळां - अशा अंतरधारणेनें त्यांनीं जे मागितलें तें अमोल आहे यात शंकेला स्थानच नाहीं.

## हरिदास म्हणजे ईश्वराचे भक्त

पांडुरंगाचे भक्त ही स्वतंत्र कुळी आहे. या कुळीमध्यें ज्यांनीं जन्म घेतला त्यांचे ध्येय आणि त्यासाठी करावयाचा कुळाचार ठरलेला आहे. पांडुरंगाची सेवा करीत, प्रत्येक वस्तूमात्रामध्यें पांडुरंगाच्या अस्तित्वाचा अनुभव घेणें ही ह्या कुळींचा मुख्य कुळाचार. असे पुरुष पांडुरंगाला आपला म्हणतात आणि त्याप्रमाणें वर्तनही करतात. अशा श्रेष्ठांना हरीचे दास, भक्त, संत अशा गौरवी शब्दांनी संबोधिलें जातें. यां सर्वांसाठीं नामदेवांचें हें मागणें आहे.

पहिल्याच चरणांत असे जे महात्मे असतील ते माझे आहेत असा स्पष्ट निर्वाळा नामदेवांनी दिला आहे. समानशीले व्यसनेषु सख्यं या वचनाप्रमाणें नामदेव हे देवाचे भक्त होते. जे भक्त नाहींत त्यांना नामदेव आपले म्हणणें शक्य नाहीं. कारण त्यांची कुळी निराळी आहे. हरिदास किंवा हरिसेवक तेवढे माझ्या कुळीतले आहेत. ज्यांना या कुळांत यावयाचें असेल त्यांना आडकाठी नाहीं. ते आंत आले कीं आमच्या कुळीचे झाले. सर्वांनीं असे व्हावें ही नामदेवांची प्रगट इच्छा आहे. याप्रमाणें सामान्य जन पांडुरंगाकडे धांवतील याची खात्री नामदेवांना आहे. हें मागणें अशा लोकांसाठी अगर भक्तांसाठीं आहे.

अशा भक्तांना कल्पाचें आयुष्य लाभावें ही नामदेवांची इच्छा. अर्थात उपजे ते नाशे या सिद्धांताप्रमाणें भक्त जरी झाला तरी जोपर्यंत त्यानें देह धारण केलेला आहे तोपर्यंत त्या देहाला मरणाच्या सीमा घालून दिलेल्या आहेत. आज ना उद्यां हा देह पडून जाईल याची जाणीव नामदेवांना होती. म्हणूनच आकल्प आयुष्य प्राप्त व्हावें तें या मर्त्य देहाला नव्हे हा सुप्तार्थ या वचनाच्या मागें आहे. सामान्य माणसालासुद्धां दोन प्रकारचें आयुष्य असतें. मनुष्यानें जन्म घेतला की त्याच्या प्रापंचिक आयुष्याला सुरुवात होते. या आयुष्याला मर्यादा आहेत. असणें नसणें, उत्पन्न होणें, वाढणें, क्षय पावणें, भास होणें वगैरे अवस्था या आयुष्याला आहेत. परंतु नामदेवांना अभिप्रेत असलेल्या आयुष्याला अस्ति एवढी एकच अवस्था आहे. कारण ही अवस्था भगवंताशी नातें सांगणारी आहे. भगवंतांना ज्याप्रमाणें अस्ति याशिवाय दुसरी अवस्था नाहीं. त्याप्रमाणें या आयुष्याला दुसरी अवस्थाच नाहीं. या आयुष्याला सामान्यांच्या दृष्टीनें कीर्ति आयुष्य म्हणतात. नारद, विदुर, गोपी, ध्रुव

वगैरे अनेक भक्त होऊन गेले. आपल्या घरांतील आपल्या आजोबा-पंजोबांच्या पलीकडे आपणास कोणी माहीत नाहीं. ते मरणानें नाहीसे झाले. तशी स्थिती या भक्तांची नाहीं. हे सर्व भक्त आपल्या कीर्ति-आयुष्यामुळें आजही अस्तित्वांत आहेस. असें अमरत्व भक्तांना मिळावें; ही नामदेवांची आर्त आहे; आणि तीच आर्त नामदेव देवापुढें सांगतात.

कल्पनेची बाधा कोणाला होऊं नये ही नामदेवांची इच्छा आहे. कल्पना या शब्दाचा या ठिकाणचा अर्थ संशय असा आहे. असें दिसून येतें कीं लोक देवाची उपासना करतात परंतु त्यांच्या मनाप्रमाणें कांहीं घडत नाहीं. असे झाल्यावर देवावरचा विश्वास डळमळायला लागतो. अर्थात याचें कारण असे उपासक देवाजवळ व्यापार करण्याचा प्रयत्न करतात. मी उपासनेत इतक्या गोष्टी केल्या म्हणजे मला एवढ्या प्रापंचिक सुविधा प्राप्त होतील असे त्यांचे गणित असतें आणि त्याप्रमाणें ते लोक वागतात. लोकांच्या समोर आपल्या भक्तीचें महान प्रदर्शन करतात. म्हणून लोक त्यांना भक्त म्हणतात. परंतु भगवंताला असली भक्ती नको. अनेक वर्षे कीर्तन करून लोकांना देवभक्तीचा उपदेश करणाऱ्या एका बाईनें खूप उपचार आणि देव देव केल्यावरसुद्धां तिची कन्या वारली म्हणून घरातले देव रस्त्यावर फेकून दिले. देवत्वाची कल्पना पूर्ण चुकीची धरून तिचा आचार चालू होता. अशा विपरित कल्पना आणि संशयमय मनानें देवाची भक्ती करणें म्हणजे आपणच आपल्या पायावर दगड पाडून घेण्यासारखें आहें. या विचित्रतेंची बाधा कोणा भक्ताला होणार नाही असं पहा. या कल्पनेपासून त्यांचें निवारण करून त्यांना सुखी कर.

अहंकार हा तर उपासनेतील फार मोठा शत्रु आहे. ज्याला चित्ताला कल्पनेचा स्पर्श झाला त्याला अहंकार घेरतो आणि नाशाकडे नेतो. म्हणूनच या अहंकाराचें स्वरूप आणि आचारमय मार्गदर्शन करण्याच्या निमित्तानें ज्ञानदेव म्हणतात कीं -

**नवल अहंकाराची गोठी ।**
**विशेषे न लगे अज्ञानापाठीं ।**
**सज्ञानाचे झोंबे कंठी ।**
**नाना संकटी नाचवी ॥**

अर्धवट ज्ञान असलेले परंतु ज्ञानी म्हणून मिरविणारे कांहीं भक्त आहेत. दोन भक्त एकमेकाला ज्यावेळीं भेटतात तेव्हां त्याच्यामध्यें परमेश्वराबद्दल चर्चा-वार्ता होते. त्यांच्या संवादातून कधी कधीं भक्तिगरिमेबद्दल ईर्षा निर्माण होते. एकमेकांकडे बंधुभावानें पाहाणारे हे मित्र बंधुभाव विसरतात आणि ईर्षेला जागा देतात. यांतूनच अहंकाराला जन्म दिला जातो आणि त्याचें पोषणही केलें जातें. आपण दुसऱ्यापेक्षां देवाचे कसे श्रेष्ठ भक्त आहोत याचें प्रतिपादन करून लोकांमध्यें मोठेपण मिरविण्याचें जणु वेडच निर्माण होतें. खाल्लेलें अन्न पचलें नाहीं म्हणजे अजीर्ण होऊन ओकारी होते. स्वत:लासुद्धां तिची घाण येते. मग इतरांचें तर दूरच राहो. उपासना पचनीं न पडल्याचें हे लक्षण आहे. असें झालें म्हणजे अहंकाराला जागा मिळते. तो फोफावतो आणि परमेश्वराच्या अन्य भक्तांबद्दल अगर इतर श्रेष्ठ संतांबद्दलसुद्धां दूषित्वाचा अंगिकार करून बोलतो. खरें तर हें तो बोलत नसून त्याचा अहंकार बोलत असतो. आपल्या भक्ताचा झालेला अपमान भगवंताला कदापि सहन होत नाहीं. अशा वेळीं दुर्वचनें बोलणाऱ्या भक्ताची अधोगती चालू होते. पारमार्थिक कल्याण तर दूरच राहो पण प्रापंचिक सुविधा किंवा कल्याण यांनासुद्धां तो पारखा होतो. केवळ अहंकाराचा स्पर्श होतांच एवढा वाईट परिणाम होतो आणि असा भक्त परमेश्वरापासून दुरावतो. म्हणून नामदेव देवाला सांगतात अहंकार हा तुझ्या आज्ञेंत राहाणारा आहे. त्याला भक्तांना स्पर्शसुद्धां करण्याची अनुज्ञा देऊं नकोस. अन्यथा ज्यांना मी माझ्या कुळीतील समजतो, भाविक भक्त समजतो त्याची आणि तुझी कदापि भेट होणार नाहीं. त्यांचें कल्याण होणार नाहीं.

देवा, ज्यांचें कायमचें कल्याण व्हावें असें वाटतें त्यांच्या जिव्हेवर तुझें नांव जडावें. आणि त्याचें मुख म्हणजे तुझ्या नामाची ठेव जपून ठेवणारें भांडार व्हावें. ज्याच्या मुखांत तुझें नांव नाहीं त्याला भक्त म्हणतां येत नाहीं. देवत्वाचा ज्यांना आचार नाहीं त्यांना भक्त कसें म्हणतां येईल. किंबहुना देवापासून जो आचार-विचारानें विभक्त झाला तो तरी भक्त कसा ठरेल. देवाचें नामस्मरण करणें म्हणजे देवाच्या हृद्य भेटीसाठी देवाच्या दारांत उभे ठाकण्यासारखें आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात एक क्षणभर देवाच्या अशा दारांत उभे राहिले असतां मुक्ती आपण होऊन समोर उभी राहाते. ज्यांची जीभ आणि मन भगवंताच्या नाम आणि स्मरणांत एकरूप झालें आहे ते देवाच्या आधीन असतात. देवावर आपला भार टाकून मोकळे होतात. आपण भगवंताची काळजी करूं लागलो म्हणजे भगवंत आपली काळजी आपोआप वाहातो. नामदेव देवाला सांगतात देवा हा अन्योन्य संबंध तुला कांहीं नवा नाहीं. कल्पवरी तुझे अगणित भक्त झाले. त्या भक्तांच्या कथा तूंच आनंदानें पुराणांतून सांगतोस आणि आनंदतोस. ज्याचे असे अन्योन्य असाधारण संबंध आहेत ते अर्थातच तुझ्याकडेच धाव घेतील. तुला येवून मिळतील. मग त्यांना मुळीच निराळे राहतां येणार नाहीं. तुझ्यामध्यें एकरूप होणें यापेक्षां भक्तांचें अधिक मोठें कल्याण नाहीं. जन्ममरणाचा प्रवास ज्या ठिकाणीं संपतो तें तुझें घर आणि तुझें सततचें हृदय-सान्निध्य हे सर्वोत्तम कल्याण आहे. तुझ्या कृपेनेंच हें कल्याण भक्तांना मिळणार आहे. ते तूं दिल्याशिवाय मलाच काय पण तुझ्या कोणत्याही भक्ताला समाधान मिळणार

(पृष्ठ क्र. ५० वर)

# ज्ञानोबांचे पसायदान

– चकोर आजगांवकर

श्री साईबावांच्या मनात ज्ञानदेव तुकोबा इत्यादी भागवत संताबद्दल अपार प्रेम आणि आदर वसत असे. एकाद्यां भक्तवराने ज्ञानेश्वरांचे नाव उच्चारले तर बाबा त्यांना प्रेमाने नमस्कार करताना आढळत. बाबांच्या आध्यात्मिक पिंडाची घडण सुफी पंथातील आणि वैष्णव भागवत संप्रदायातील प्रेमकरूणेच्या तत्वज्ञानाने घडलेली होती. सुफी संत फकीर मौलवीबक्ष (रोशनशहा) आणि सेलूचे गोपाळस्वामी (व्यंकुशा) यांच्याकडून देव आणि गुरूप्रेमाचा वारसा बाबांनी उचलला. ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या अखेर विश्वात्मक देवाकडून प्रसाद मागताना जे पसायदान लिहिले आहे त्यातील विश्वाबद्दलची प्रेम, करूणा आणि कणव ही भारतीय अध्यात्माचे बोधचिन्ह आहे. श्री साईबाबा हे प्रेम करूणेचे जिवंत प्रतीक होते. विजयादशमीस देहत्याग करताना त्यांनी तात्या कोते पाटलाचे मरण स्वत: स्वीकारले तेहि अपार प्रेमकरूणेनेच होते.

## ज्ञानदेवांचे पसायदान

आता विश्वात्मके देवे ।
येणे वाग्यज्ञे तोषावे
तोषोनि मज द्यावे ।
पसायदान हे ॥१॥

जे खळांची व्यंकटी सांडो ।
तया सत्कर्मी रती वाढो
भूतां परस्परे पडो ।
मैत्र जीवांचे ॥२॥

दुरितांचे तिमिर जावो ।
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो
जो जें वांछील तो ते लाहो ।
प्राणिजात ॥३॥

वर्षत सकळमंगळी ।
ईश्वरनिष्ठांची मांदियाळी
अनवरत भूमंडळी ।
भेटो तयां भूतां ॥४॥

चला कल्पतरूचे आरव ।
चेतना चिंतामणीचे गांव
बोलते जे अर्णव ।
पीयूषाचे ॥५॥

चंद्रमे जे अलांछन ।
मार्तंड जे तापहीन
ते सर्वांहि सदा सज्जन ।
सोयरे होतु ॥६॥

किंबहुना सर्वसुखी ।
पूर्ण होऊनि तिही लोकी
भजिजो आदिपुरुखी ।
अखंडित ॥७॥

संतधर्माचा गाभा नीतीचा, सात्त्विक गुणांच्या उदयाचा, विश्वात्मक प्रेमाचा, समदृष्टीच्या करूणेचा, कडकडीत कर्तव्यबुद्धीचा, तसेच निस्वार्थ निरपेक्ष मानवसेवेचा आहे हे एकदा समजले म्हणजे ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीच्या शेवटी आपल्या वाग्यज्ञाच्या समाप्तीच्या फलश्रुतीसाठी पसायदानात जे मागणे केले, ते महाराष्ट्रातील संतधर्माचे बोधवाक्य आहे, हे माझे विधान किती मर्मग्राही व अंतरंगस्पर्शी आहे, याचा प्रत्यय येईल. नाथसंप्रदायाने जातिधर्म निरपेक्ष साधनेचा व गुरूकृपेचा दिव्य वारसा जपला होता. समाजात प्रत्यक्षात आणून दाखविला होता. त्याचा दिव्य वारसा घेऊन ज्ञानेश्वर उदयाला आले. सात्त्विकता, साधना आणि विश्वकल्याणाची ही विचारधारा व आचारवाहिनी ज्ञानदेवांनी महाराष्ट्रात रूजविली, वारकरी पंथातून आणि शुद्ध साधकाद्वारे ती येथे स्थिरपद केली. नामदेव हे ज्ञानदेवांचे एक छायारूप. त्यांनी ज्ञानदेवांचा मार्ग उत्तर भारतात नेला. त्याचा प्रभाव कबीर नानकादि उदारमनस्क महात्म्यांनी प्रेरणादायक मानला. ही विश्वात्मक गुरूदेवाची आळवणी आणि त्यातून उद्‌भवणारी उदार व्यापक कृपा करूणा यांचा उद्‌घोष पसायदानाच्या दिव्य आणि युगप्रेरक शब्दसिद्धीतून झालेला आहे. ज्ञानदेवांनी सामाजिक असहिष्णुता व यांत्रिक धर्मविचाराचे विष बालवयात पचवून आदिनाथ शिवाप्रमाणे हलाहल प्राशन केले. जगाला मात्र अमृतमय चित्तचकोर चंद्रिका ज्ञानरसवंती ज्ञानदेवी ही संजीवनी मुक्तपणे वाटली. ज्ञान, योग, कर्म या शरीर मनबुद्धी पातळीवरच्या दिव्यसाधनाना खरी बैठक व आधार विश्वात्मक करूणेचा व विवेकी भक्तीचा आहे, हे प्राणभूत मूलतत्त्व ज्ञात देवांनी आध्यात्मिक आणि धार्मिक जगाला आपल्या वाणीने, कृतीने आणि सर्वजातीतील अनुयायी संतमंडळाच्या शिकवणुकीद्वारे पटविले. धर्म आध्यात्म याकडे पहाण्याचा विशुद्ध दृष्टीकोन ज्ञानराजांनी आपणा सर्वांना दिला. धर्मजीवन म्हणजे स्वत:चा व समाजाचा (व्यष्टी आणि समष्टीचा) समांतर सुसंगत आणि एकजीनसी विकास आहे, ही नवी दृष्टी ज्ञानेश आणि त्यांच्या पंक्तीतील संतपरंपरेने महाराष्ट्राला व भारताला दिली.

सगुणनिर्गुणात एकच भगवंत आहे. सर्वरूपे, सर्वनामे व सर्वमार्ग एकच आहेत, या अवलिया नाथसंताच्या मताचा हा जणु दिव्य असा अनुकार होता. विश्वात्मक देवाकडे, त्या गुरूरूप ईश्वराकडे ज्ञानदेवांनी असे दिव्य पसायदान मागितले की त्यामुळे जसा व्यक्तीचा विकास व्हावा; तशी कुटुंबाची, श्रद्धावान गटांची, समाजाची, देशाची आणि राष्ट्राची उन्नती व सर्वांगीण कल्याण व्हावे.

**पसायदानाचे हृद्गत**

ज्ञानेश्वरीरूपाने एवढे मोठे दिव्य यज्ञकर्म ज्ञानदेवांनी पार पाडले. त्या दिव्य यागाच्या शेवटी त्या हृदयात रहाणाऱ्या तरीही विश्व व्यापणाऱ्या विश्वात्मक गुरूदेवाकडे ज्ञानेश्वर विनम्र वाणीने स्वत:साठी काहीही मागत नाहीत. हे विश्व हाच त्यांचा संसार असल्यामुळे त्यांच्यापाशी स्वत:च्या कल्याणापुरता विचार केव्हाहि नसतो. ते जे मागतात ते अपार करूणा व कणव यांनी भरलेल्या आणि भारलेल्या आर्त हृदयाने मागत आहेत. कारण जगातील व्यक्तींची मने व बुद्धी त्यांच्या पूर्व कर्मानुसार व भावी संकल्पानुसार घडलेली आहेत. ती बदलण्याचे सामर्थ्य व्यक्तीमध्ये नसते. एक महात्मा सात्त्विक वा रजोगुणी मनांमध्ये स्थित्यंतर करून त्याला भक्तीचा मुलामा, ज्ञानाचा प्रकाश व योगाची दिव्यता देऊ शकतो. पण तमाने व्यापलेल्या, वक्रबुद्धीच्या पाखंडी खलदुष्टांची मती कशी बदलणार ? त्यांना सत्कर्म करण्याची इच्छा कशी होणार ? एकमेकांवर प्रेम करण्याचे ते कसे शिकणार ? त्यासाठी विश्वात्मकाच्या कृपेची, प्रेरणेची, आणि हस्तक्षेपाची गरज आहे. ती शक्ति त्या विश्वात्मक अशा विश्वमनामध्ये आहे. ज्याच्या संकल्पाने हे विश्व उत्पन्न झाले, तो विश्वात्माच हे करू शकेल. यास्तव ज्ञानेश्वर त्याच्या चरणी प्रार्थना करीत आहेत. त्या विश्वात्मकाच्या करूणेमुळे वाईट विचार वा घटनांचा अंधकार दूर होवो. विश्वाला स्वधर्माचा व कर्तव्याचा खरा प्रकाश स्पष्ट दिसो. प्रत्येकाच्या मनोकामना पूर्ण होवोत. सर्वत्र मांगल्याचा वर्षाव करीत ईश्वरावर निष्ठा असलेली माणसे एकत्र येवोत. कल्पतरू, कामधेनू व चिंतामणीची ज्यांना उपमा देता येईल, अशी साधुजन, संतमहात्म्यांची भेट आणि सत्संग सर्वांना लाभो आणि विश्वाचे सर्वांगीण कल्याण होवो. सर्वसुखें, सर्वमंगले, सर्वसौभाग्ये सर्वांच्या दारी येवोत.

या दिव्य पसायदानात ज्ञानदेवांनी विश्वाचे भौतिक, प्रापंचिक, पारलौकिक आणि आध्यात्मिक कल्याण चिंतिले आहे, ही त्यांची थोरवी अतुलनीय मानावी लागते.

ज्ञानेश्वरीतून सत्वसंपन्नता, ज्ञानभक्तिकर्मयोग साधनेचे मर्म व आचार सांगूनहि त्यांनी अज्ञानतमात गुरफटलेल्या जनांना कृपेचा आधार परमेश्वराकडून अनपेक्षपणे लाभावा, याची मागणी केली आहे. जे साधनेने जमणार नाही, ते कृपेने, सत्संगाने सहजपणें घडावे ही ज्ञानदेवांची आर्त आहे. एवढे मागणे मागून ते स्वेच्छेने व्यवहारी जगातून अंतर्धान पावले आणि आपल्या श्रेष्ठतम सामरस्य अवस्थेच्या संजीवन समाधीत जाऊन बसले. मन उत्स्फूर्तपणे म्हणते -

**ज्ञानेश कोठला? तो माधव योगेंद्र**
**अज्ञानतमीचा ज्योतिर्मय की चंद्र**
**मधुरता येतसे गुरूभक्तीस सुधेची**
**गुंजते तेधवा वाणी ज्ञानेशाची !**

**शब्दात बांधुनी त्याने चैतन्याला**
**कैवल्यपुरीचा पंथ मोकळा केला**
**लागते आस या जिवास परमशिवाची**
**गुंजते तेधवा वाणी ज्ञानेशाची!**

---

(पृष्ठ क्र. ४८ वरून)

नाहीं. देवा लहानपणापासून मी तुझ्याजवळ हट्टच करीत आलों आहे. सर्वा भक्तांचें कल्याण तूं करावेस हा माझा अखेरचा हट्ट आहे. पूर्वीचे हट्ट तूं पुरविलेस तसाच हा हट्टदेखील तूं पूर्ण कर.

आपण मागितलेलें पसायदान देवाला रूचलें की नाहीं हें कळावें म्हणून नामदेव थांबले. ज्ञानदेवांनी पसायदान मागितल्यानंतर निवृत्तिनाथांनी 'हा होईल दानपसावो' म्हणून ज्ञानदेवांना धीर दिला. ज्ञानदेवांना किती आनंद झाला होता. असा विचार करीत असतानांच देव नामदेवांना म्हणाले

**घे रे घे रे नाम्या दिलें माझें प्रेम ।**
**घोकी माझें नाम सर्वकाळ ।।**
**शिरावरी हात ठेवितसे माझ्या ।**
**अभिमान तुझा गेला म्हणूनि ।।**
**भक्तिसुख देवें दिधलें नामयातें ।**
**नामा परमामृतें तृप्त झाला ।।**

(नामदेवगाथा : सरकारी प्रत १७०६)

नामदेवा घे. घे माझें नांव. तूं ज्या प्रेमानें माझें नांव उच्चारतोस तसेंच प्रेम मी तुला दिलें आहे. तूं माझा भक्त आहेस आणि भक्तच असावास. तुझ्या आणि माझ्यामध्यें कोणत्याही प्रकारें अंतर पडूं नये असें मला वाटतें. तुझ्या या मागण्यामुळें मला असें दिसून आलें की तुझा गर्व-अभिमान पूर्ण नाहीसा झाला आहे. ज्याचा अहंकार गेला त्याला मी माझा म्हणतो. देवानीं नामदेवांच्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेवला त्यामुळें नामदेवांना देखील ज्ञानदेवांप्रमाणे धन्यता वाटली.

ज्ञानदेवांप्रमाणें नामदेवांचें हें पसायदान देखील संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठींच आहे. यामध्यें देश, धर्म, वंश, जात, पंथ, गरीब-श्रीमंत, ज्ञानी-अज्ञानी, लहान-मोठा असल्या भेदांना मुळीच थारा नाहीं. म्हणूनच पांडुरंगाच्या पायाशीं लडिवाळपणें रूळणारे मराठी मन या पसायदानानेंच विश्वसीमित झाल्याचे आजही अनुभवाला येतें.

---

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी

### प्रकाशित फोटोंची यादी

| अनु-क्रमांक | फोटोचे नाव | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १. | [illegible] बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| २. | [illegible] बसलेले बाबा (४ रंगात) | पोस्टकार्ड | - |
| ३. | [illegible] बसलेले बाबा (४ रंगात) | २'' x ३'' | ०.२० |
| ४. | द्वारकामाई (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ५. | द्वारकामाई (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ६. | मूर्ती (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| ७. | मूर्ती (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ८. | मूर्ती (४ रंगात) | ७'' x १४'' | ०.७० |
| ९. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १४'' x २०'' | २.६० |
| १०. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | १०'' x १४'' | १.३० |
| ११. | द्वारकामाईत बसलेले बाबा (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १२. | चेहरा फोटो (४ रंगात) | पोस्टकार्ड | ०.३० |
| १३. | [illegible] (४ रंगात) | ७'' x १०'' | ०.७० |
| १४. | [illegible] बसलेले बाबा (काळा/पांढरा) | १४'' x २०'' | २.१० |

सर्व फोटोंकरिता पॅकिंग व पोस्टेजचा दर रु. २.०० आहे.

## श्री साईबाबांच्या पादुका केवळ शिरडी येथेच !



आज-काल बाबांच्या नावावर असंख्य ठिकाणी पादुका दिसतात. या पादुका म्हणजे नुसत्या पादुकांच्या प्रतिमा असतात. त्या बाबांनी वापरल्या असण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसतो. तरीही त्या प्रतिमांच्या दर्शनासाठी हजारो भाविक गर्दी करतात. हा त्या पादुकाप्रतिमांचा प्रभाव नसून सामान्य माणसाच्या मनातील बाबांविषयीच्या श्रद्धेचा प्रभाव असतो. श्री साईबाबा संस्थान, शिरडीच्या व्यवस्थापन मंडळाने एका ठरावाद्वारे सर्व भाविकांना सूचित केलेले आहे की, श्री साईबाबांनी वापरलेल्या प्रत्यक्ष पादुका शिरडी येथे समाधीमंदिरातच असून तशा पादुका अन्यत्र कुठेही नाहीत, याची भाविकांनी कृपया नोंद घ्यावी.

Registered with the Registrar
of News-papers of India
No. MH/527

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी

## प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु-क्रमांक | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्चरित | मराठी | ४८.०० | १२.०० |
| २. | श्री साई सत्चरित | इंग्रजी | १८.५० | १०.०० |
| ३. | श्री साई सत्चरित | हिंदी | २४.०० | १०.०० |
| ४. | श्री साई सत्चरित | गुजराथी | २३.०० | १०.०० |
| ५. | श्री साई सत्चरित | कन्नड | २२.०० | १०.०० |
| ६. | श्री साई सत्चरित | तेलुगु | २७.०० | १०.०० |
| ७. | श्री साई सत्चरित | तामीळ | २७.०० | १०.०० |
| ८. | श्री साई सत्चरित | सिंधी | २२.०० | १०.०० |
| ९. | श्री साई सत्चरित पोथी | गुजराथी | ३१.०० | १२.०० |
| १०. | श्री साईलीलामृत | मराठी | ९.५० | १०.०० |
| ११. | श्री साईलीलामृत | हिंदी | १२.५० | १०.०० |
| १२. | श्री साईलीलामृत | गुजराथी | ६.६५ | ८.०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६.८० | ८.०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | १.०० | ८.०० |
| १५. | स्तवन मंजिरी | हिंदी | १.१५ | ८.०० |
| १६. | स्तवन मंजिरी | गुजराथी | १.३० | ८.०० |
| १७. | स्तवन मंजिरी | इंग्रजी | २.०० | ८.०० |
| १८. | सगुणोपासना (आरती) | मराठी | १.२५ | ८.०० |
| १९. | सगुणोपासना (आरती) | हिंदी | १.५० | ८.०० |
| २०. | सगुणोपासना (आरती) | गुजराथी | १.१० | ८.०० |
| २१. | सगुणोपासना (आरती) | तेलुगु | ४.६० | ८.०० |
| २२. | सगुणोपासना (आरती) | सिंधी | - | ८.०० |
| २३. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | ३.०० | ८.०० |
| २४. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | - | ८.०० |
| २५. | मुलांचे साईबाबा | मराठी | २.०० | ८.०० |
| २६. | मुलांचे साईबाबा | इंग्रजी | २.६० | ८.०० |
| २७. | मुलांचे साईबाबा | हिंदी | २.०० | ८.०० |
| २८. | मुलांचे साईबाबा | गुजराथी | १.७५ | ८.०० |
| २९. | मुलांचे साईबाबा | तेलुगु | - | ८.०० |
| ३०. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | १.१५ | ८.०० |
| ३१. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ६.७० | ८.०० |
| ३२. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | - | ८.०० |
| ३३. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३.५० | ८.०० |
| ३४. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | - | १०.०० |
| ३५. | खापर्डे डायरी | इंग्रजी | ११.०० | १०.०० |